# धागेदोरे

**( दोन अंकी नाटक )**

**चं. प्र. देशपांडे**



# धागेदोरे

## ( दोन अंकी नाटक )

**- चं. प्र. देशपांडे**

**अंक पहिला**

दि सुपर इंजिनियर्स प्रा. लि. च्या मॅनेजरच्या बंगल्यातील दिवाणखाना. मॅनेजर मोहिले (४७), त्यांची पत्नी सौ. मालती (४५), कन्या कु. प्रिया (१७) आणि नोकर धोंडी (६०) यांची काहीतरी प्रचंड शोधाशोध चालू आहे. सगळे अत्यंत अस्वस्थ, काळजीयुक्त आणि अधीर चेहऱ्यांनी शोधाशोध करताहेत. काही सामान विस्कटले गेलेले. सरकवासरकवी,उघडझाप, उचलठेव -- असे चालू.

प्रिया : (कंटाळून बसत -- ) जाऊं दे. असेल कुठंतरी. सापडेल. सगळं बघून झालं.

मालती : ( प्रियाकडे पाहत, मग डॉवर उघडत -- ) असं कसं म्हणतेस प्रिया -- घरातच असणार तो -- नीट शोधायला नको ? ( ड्रॉवर मिटते. )

मोहिले : नुसतं त्या ड्रॉवरमधे कितींदा बघणार आहेस तू ? जरा आत बघा -- पातेली उलटून बघ, पिशव्या बघ, डब्यांच्या मागं कुठं आहे का बघ, गॅस सिलिंडरच्या कोपऱ्यात बघ -- की नुसतंच आपलं त्या टेबलाचा ड्रॉवर ?

मालती : ( आपल्या प्रामाणिकपणाचा अपमान झाल्यासारखे पाहून आत जात -- ) -- हं -- बघते -- ( आतून--) स्वत: नीट काळजी घ्यायची नाही आणि नंतर दुसऱ्यांवर चिडायचं --

मोहिले : धोंडी, तू व्हरांड्यात, बेडरूममधे वगैरे बघ -- जा --

धोंडी : जी -- ( जातो. )

मोहिले : प्रिया, निदान तू स्टडीमधे तरी बघ -- अं --

प्रिया : सापडेल की पप्पा -- इतके अधीर कसे होता तुम्ही -- ( जाते. मोहिले नि:श्वास टाकून उभे.. पुन्हा कामाला लागतात. शंका येईल त्या त्या जागा काळजीपूर्वक बघत राहतात. असा थोडा वेळ गेल्यावर मालती, धोंडी आणि प्रिया एकेका बाजूने येतात. एकेकजण येईल तसतसे मोहिले पाहतात.)

मोहिले : ( शेवटी आलेल्या प्रियाला --) नाही ?

प्रिया : नाही ! ( बसून -- ) सगळं बघून झालं.

मोहिले : ( मालती आणि धोंडीकडे पाहात --) म्हणजे आता थांबणार की काय तुम्ही ? धोंडी, तू पण ?

धोंडी : नाही जी -- बघतो की अजून -- ( जातो. )

मोहिले : माझी ब्रीफकेस बघू -- मला वाटतं उघडी होती ती -- आणि नंतर मिटली मी -- ( मालती ब्रीफकेस आणते. ते उघडून पाहतात. पुन्हा मिटवतात. सुस्कारून, थकून, हताश उभे. एवढ्यात फॅक्टरीतले दोन अधिकारी शिंदे आणि मराठे येतात. दोघांचेही वय सुमारे ३७. शिंदे स्मार्ट पण जरा अलिप्त आणि मराठे जरा बुळचट. दिवाणखान्याची एकूण अवस्था बघून थबकतात. मराठे स्वत:च्या चेहऱ्यावरचे स्मित पुसतात. पुढे येतात. मोहिले दोघांकडे पाहतात.)

मराठे : गुड मॉर्निंग सर !,

शिंदे : गुड मॉर्निंग !

मोहिले : गुड मॉर्निंग, गुड मॉर्निंग ! आमचा पिट्टू हरवलाय हो -- तीच शोधाशोध चाललीय --

मराठे - पिट्टू ?

शिंदे : साहेबांचा पांढरा उंदीर !

मराठे : हां हां -- तो पांढरा उंदीर ! बरोबर !

मोहिले : काय बरोबर !

मराठे : काही नाही -- आलं लक्षात -- तुम्ही पाळलेला पांढरा उंदीर -- यस् यस् !

शिंदे : आम्ही काही मदत करू का शोधायला ? -- घरात बघितलं सगळीकडे ?

मराठे : हो, हो -- आम्ही करतो ना मदत --

मोहिले : सगळं घर धुंडाळून झालं हो --

शिंदे : ( मराठ्यांना --) आपण बाहेर बागेत वगैरे बघू -- चला -- असणार इथंच कुठतरी --

मराठे : हं -- चला -- मी तेच म्हणणार होतो -- ( दोघेही जातात. मोहिले थकून बसतात. व्यग्र.)

प्रिया : ( बसल्याबसल्या काही क्षण मोहिल्यांकडे एकटक पाहते. त्यांचे लक्ष नाही.) डोंट वरी पप्पा ! सांपडेल !

मोहिले : अं ? -- हं !

प्रिया : तुमचं एक गूढच आहे पप्पा ! एखाद्या किरकोळ गोष्टीनंही तुम्ही भयंकर अस्वस्थ होता आणि एखाद्या मोठ्या प्रसंगातही अजिबात न डगमगता राहू शकता.

मालती : अंदाजच लागत नाही त्यामुळं माणसाचा.

मोहिले : मालती, माझा अंदाज घेणारे पुष्कळ आले आणि गेले -- आणि अजूनही येतील -- मी तसा सोपा नाही, हे कळून चुकेल सगळ्यांना !

प्रिया : पण पप्पा, आपण सोपे नाही हे दुसऱ्यांना आयुष्यभर पटवून देत बसण्यात काय एवढं थ्रिल वाटतं तुम्हाला ?

मालती : आणि समजा, जगातल्या सगळ्या माणसांनी मान्य केलं की तुम्ही सोपे नाही --

मोहिले : ( चिडून -- ) कीप क्वाएट ! तुम्हा बायकांना नाही कळायचं ते !... मुलगा हवा होता घरात.. जगायला हवा होता तो .. पण ...सगळे प्रयत्न वाया गेले आणि हे नुसतं बायकांचं घर राहिलं .. तो असता तर प्रियापेक्षा मोठा असता तो आज...

मालती : ( डोळे पाणावून -- ) मी सुध्दा मनातून काढून टाकलंय ते -- आपला काही इलाज आहे का ? तुमचंही दु:ख कळतं मला -- मी सुध्दा सारखं दुसऱ्या कशात तरी मन गुंतवत राहते --

मोहिले : शांत हो मालती, या बाबतीत तुझी काही चूक आहे असं कधीही म्हणायचं नाहीय मला -- मुलगा गेल्याचं दु:ख आणि माझे प्रयत्न थिटे पडल्याचं दु:ख ! -- आणि नंतर मुलगा न होणं !-- आपल्या इच्छेप्रमाणे न घडणं ! त्रास होत राहतो याचा !

प्रिया : मला कंटाळा आला तेच तेच ऐकून ऐकून -- ( उठते आणि आत जाते. मोहिले अस्वस्थ. )

मोहिले : प्रियासमोर हा विषय खरं तर कधीही निघायला नकोय -- हजारदा ठरवतो -- पण -- ( मान झटकतात. दारात शिंदे आणि मराठे उभे. मालती आत जाते. मराठ्यांचे हात चिखलात माखलेले आहेत ते पाहून -- चिडकेपणाने -- ) हं -- काय झालं ?

मराठे : नाही मिळाला --

मोहिले : ते वाटलंच होतं मला -- ( हातांकडे पाहून -- ) हे काय ?

शिंदे : बागेत पडले ते -- शोधाशोध करताना .

मराठे : म्हणजे एकदम् पडतच होतो, तर हात टेकले -- हं -- म्हणून --

मोहिले : शिंदे तुम्ही आत या -- ( मराठ्यांना --) बागेतल्या नळावर हात धुवून या -- जा !

मराठे : ( जाऊ लागतात पण मधेच वळून --) कुणीकडच्या बाजूला हो शिंदे ? नळ ?

मोहिले : ( शिंदे काही बोलण्यापूर्वीच -- ) अहो, बघा तिथे ! जा ! ( मराठे जातात.) असली मेंगळट माणसं बघितली की ओकारी येते मला ! ( शिंदे काही बोलत नाहीत. ) गूढच घडलं म्हणजे हे एक ! कसा काय हरवला असेल -- काही अंदाजच लागत नाही --

शिंदे : साहेब, काही गोष्टी जरा डिस्कस करायच्या होत्या. विशेषत: संपाच्या हालचालींच्या बाबतीत.

मोहिले : आत्ता नको -- दुपारी बोलू -- मिस्टर शिंदे नो डाऊट यू आर क्वाइट एफिशियंट, द ओन्ली डिफेक्ट विथ यू इज यू आर वीक ॲट अंडरस्टॅंडिंग युवर सुपिरिअर्स !

शिंदे : सॉरी सर ! ठीक आहे. दुपारी बोलू. ( मराठे रुमालाने हात पुसत आत येतात. त्यांच्या चेहऱ्यावर स्मित आहे. )

मराठे : हात धुवून आलो साहेब -- काय झालं, मी जे हात टेकले ते नेमके चिखलात टेकले गेले -- म्हणजे पाणी मारलं असेल सकाळी बागेत आणि --

मोहिले : ठीक आहे. बसा. उगीच फालतू सगळं काय सांगत बसताय !

मराठे : ( मनावर न घेता --) हे मात्र कठीण झालं आता -- म्हणजे कुठंच सापडत नाही म्हणजे कमाल झाली ! गेला तरी कुठं म्हणतो मी !

मोहिले : हं --

शिंदे : इथं मांजरबिंजर येत नाही ना ?

मोहिले : ( ताडकन् -- ) हाऊ डु यू डेअर टु से धिस ? बोलवलं तरी कसं तुम्हाला हे ?

शिंदे : नाही साहेब, तुम्हाला दुखवायचा उद्देश नव्हता माझा -- सॉरी --

मराठे : नाही. शंका ठीक आहे. पण उंदीर हरवला म्हटलं की एकदम् मांजराचा विचार करणं म्हणजे धक्कादायकच होतं जरा ते -- असो -- साहेब, पण आता हा हरवला म्हटल्यावर करमणार कसं तुम्हाला ? त्याच्याशिवाय म्हणजे आय कॅन इमॅजिन व्हाट इट मीन्स टु यू !

मोहिले : ( सुस्कारत --) ...हं ऽ ऽ ! कठीण आहे ! कधी सापडतोय परत कोण जाणे !

शिंदे : ( गंभीरपणे --) साहेब, हवं तर मी तुम्हाला दुसरा एक पांढरा उंदीर आणून देऊ शकेन --

मोहिले : मिस्टर शिंदे, तुम्हाला काही भावना वगैरे समजतात की नाही ? दुसरे शंभर पांढरे उंदीर आणता येतील पण त्यांची याच्याशी बरोबरी होऊ शकेल का ? का तुम्ही दुसऱ्या उंदराचा विषय काढलात शिंदे, का ? ( भावनाविवश होत जातात...) तो माझा इतक्या दिवसांचा साथीदार होता...तो फक्त एक पांढरा उंदीर होता, असं समजता तुम्ही ? बस्स ? तसं नाहीय शिंदे ! तसं नाहीय ! दुसरा कुठलाही उंदीर

त्याची जागा घेऊ शकणार नाही । शक्यच नाही ! सकाळचं कोवळं ऊन त्याच्या पांढऱ्या स्वच्छ केसांवर पडलेलं पाहिलं की कसं प्रसन्न वाटायचं ! त्याचे लाल ओठ आणि डोळ्यांभोवतीची लाल वर्तुळं कशी कोवळीकोवळी, ताजीताजी वाटायची ! मूर्तिमंत प्रेमाची नाजूक मूर्ती वाटायचा तो ! आणि त्याच्या डाव्या डोळ्याच्या ज ऽ ऽ रा खाली असलेला तो काळा तीळ ! वाटायचं, हा काळा तीळ म्हणजे अश्रू आहे एक … प्रेमाचा ! … प्रेमाश्रूच ! … आणि जरा बारकाईनं पाहिलं की वाटायचं – नाही ! नुसता अश्रू नाहीय हा ! हे चिंतन आहे त्याचं ! ही फिलॉसॉफीच आहे त्याची ! एखाद्या मनापासून जपलेल्या आयडियालॉजीसारखा वाटायचा तो तीळ ! वाटायचं की बास ! याच्यात दडलीयत सगळी रहस्यं ! आपण हसतो का, चिडतो कसे, आपल्याला रडू का येतं -- सगळं ! जीवनाचा सगळा अर्थच साठलाय असं वाटायचं त्यात ! हा तीळ जर आपण पाहिला नसता तर कदाचित् आपल्याला काहीच कळलं नसतं, असं वाटायचं ! एकाच वेळी आपण शिकतोयही आणि सावरलेही जातोय असं वाटायचं । तो तोच होता शिंदे, त्याला तोड असूच शकत नाही ..असूच शकत नाही…

शिंदे : सॉरी सर -- म्हणजे मला कल्पना नव्हती की --

मोहिले : तुमचा दोष नाहीय तो शिंदे -- तुम्ही नीट निरखून, प्रेमानं कधी पाहिलंच नाहीत त्याच्याकडे तर कसं लक्षात येणार हे तुमच्या ? आता तो सापडला की पहा एकदा तुम्ही त्याच्याकडे -- आणि मग सांगा मला, काय वाटतं ते !

मराठे : मी एकदाच पाहिलं होतं साहेब असं त्याच्याकडे पण मला काही पेललं नाही ते ! अक्षरश: म्हणजे भीतीच वाटली ।

मोहिले : शक्य आहे. त्या तिळामुळं विशेषत: त्याचं व्यक्तिमत्व एकूणच अत्यंत प्रभावी वाटायचं -- म्हणजे वाटणारच -- सापडेल तो -- हरवणार नाही तसा -- त्याच्याशिवाय जगायचं ही कल्पनाच मला असह्य वाटते -- अशक्यच वाटतं ते -- छे ! काय मी सगळं पर्सनल सांगत बसलोय तुम्हाला --

मराठे : मलासुध्दा वाटतं साहेब की तो सापडणारच म्हणून -- पण म्हणजे बघा -- आग्रह नाही – तुम्हाला पटत असेल तरच हं -- म्हणजे माझी तयारी आहे म्हणून म्हणतोय मी --

मोहिले : बोला मराठे, बोला --

मराठे : म्हणजे अर्थात त्याच्याशी बरोबरी होऊ शकणार नाही हे मान्य करूनच बोलतोय मी हे -- पण माझा अनुभव थोड्याफार प्रमाणात का असेना पण तुमच्याशी मिळताजुळता वाटला म्हणून मला असं वाटलं की आपण ही ऑफर करावी --

मोहिले : कसली ?

मराठे : अर्थात् माझा अनुभव तितका दर्जेदार नसेल म्हणा -- पण म्हणजे तो सापडेपर्यंतच म्हणतोय मी –

तर तो सापडेपर्यंत, मी पाळलेलं एक काळं मांजर आहे, ते मी तुम्हाला देऊ शकेन -- आणि तेही असंच जरा अर्थपूर्णच आहे -- म्हणजे मला तसं वाटतं, म्हणून म्हणतोय मी --

मोहिले : ( संतापून ताडकन् -- ) तुमचं काय डोकंबिकं फिरलंय का काय ? चक्क माझ्या पांढऱ्या उंदराच्या जागी तुमचं काळं मांजर मला घ्यायला सांगता ? काय लाजबीज गुंडाळून ठेवली का काय तुम्ही ?

मराठे : नाही म्हणजे -- नाही म्हणजे --

मोहिले : काय ' नाही म्हणजे ' ? तुम्ही कसलातरी सूड उगवताय माझ्यावर ! उंदराऐवजी मांजर ! ?

मराठे : नाही, चुकलं साहेब -- पण फक्त तुमच्याबद्दलच्या प्रेमामुळंच बोललो मी ते --

मोहिले : गटारात टाकून द्या ते तुमचं मांजर ! ईडियट !

शिंदे : साहेब, मला वाटतं, तुम्ही बरेच डिस्टर्ब झालायत -- तुम्हाला जरा विश्रांतीची गरज आहे -- जाऊ मी ?

मोहिले : ( भानावर आल्याप्रमाणे, थकून बसत -- ) ऑल राईट, ऑल राईट -- ठीक आहे --

शिंदे : दुपारी भेटेन मी -- म्हणजे तुम्ही येऊ शकलात ऑफीसला तर -- टेक रेस्ट । बरंय मग !
( मराठेंना -- ) बरंय मिस्टर मराठे !

मराठे : अच्छा ! ( शिंदे जातात. काही क्षण रिकामे. )

मोहिले : ( बसूनच -- थकल्या आवाजात --) तुमचा अपमान करायचा नव्हता मला मराठे -- तुम्ही माझ्याशी किती प्रेमानं वागता याची कल्पना आहे मला -- आणि तरीही मी काहीतरी बोलून बसलो --

मराठे : विसरून जा ते साहेब ! तुम्ही कोणत्या मन:स्थितीत बोललात ते समजू शकतो मी ! मला अजिबात दु:ख झालेलं नाही त्याचं ! खरंच !

मोहिले : आभारी आहे मराठे, आभारी आहे मी ! तुम्ही तुमचं आवडतं मांजर देऊ केलंत मला हा खरंच तुमचा मनाचा मोठेपणा आहे. पण विचार करा मराठे -- समजा की मी ते स्वीकारलंय ... आणि इथं घरात ते खेळतंय, बागडतंय... आणि अशा वेळी मोठ्या प्रयत्नानं घर शोधत पिट्टू समजा परत आला -- असा इकडे दारापाशी -- तर त्याला काय दिसणार ? हेच ना की आपली जागा आता एका काळ्या मांजरानं घेतलेली आहे ? हे पाहून काय वाटेल त्याला मराठे ? त्याच्या दु:खाची कल्पना करू शकाल तुम्ही ? अत्यंत व्यथित अंत:करणानं, दारातूनच, आल्या पावली परत जाईल तो मराठे...आल्या पावली परत जाईल . आणि मग पुन्हा कधीच इकडे येणार नाही तो .. सांगा -- येईल ? आणि मग बाहेर त्याचं काय होईल कोण जाणे ... असा शेवट करायचा का त्याचा मराठे ?

मराठे : बरोबर आहे साहेब -- हा विचार माझ्या डोक्यात आला नव्हता --

मोहिले : तो कुठंही असला तरी धडपडून, प्रयत्न करून तो इकडे परत येईल असं मात्र वाटतंय मला -- तो परत आल्याशिवाय राहणार नाही --

मराठे : होय साहेब --

मोहिले : तो कुठं असेल -- कसल्या अवस्थेत असेल --

मराठे : ... काय करत असेल.. काय खातपीत असेल ..खरंच ...

मोहिले : लौकरात लौकर तो परत आला तर बरं होईल -- अक्षरश: मुके घेईन मी त्याचे -- आणि मग मात्र कधीच अंतर देणार नाही मी त्याला -- कधीच हरवू देणार नाही -- कसं काय माझं दुर्लक्ष झालं त्याच्याकडे --- ( धोंडी येऊन उभा, त्याच्याकडे लक्ष जाऊन --) धोंडी, असं ऐकत उभा राहात जाऊ नको म्हणून सांगितलंय ना तुला ?

धोंडी : जी साहेब -- ( जातो. )

मराठे : काल मी पारेख साहेबांच्याकडे गेलो होतो साहेब -- तुमच्याबद्दल फार चांगलं बोलत होते !

मोहिले : ( सिगरेट-लायटर काढत -- ) काय म्हणत होते ?

मराठे : तुमचा कामाचा झपाटा फार दांडगा आहे म्हणत होते .

मोहिले : ( सिगरेट पेटवून, एक मोठा झुरका ओढून, धूर सोडून --) हं ऽ ऽ । आणखी काय म्हणत होते ?

मराठे : तुमच्या बरोबर त्यांनी काही काळ काम केलं याचा त्यांना अभिमान वाटतो असं म्हणाले ! तुमचा स्टॅमिना आणि जिद्द -- फार वाखाणत होते !

मोहिले : बरेच दिवसांत भेट नाही आमची -- ( पुन्हा झुरका. )

मराठे : होय -- तेही तेच म्हणत होते --

मोहिले : हं ऽ ऽ !.. आणखी काय म्हणत होते ?

मराठे : ते आज ज्या पोझिशनला आणि स्टेटसला आहेत, त्यात तुमच्या मार्गदर्शनाचा फार मोठा वाटा आहे असं म्हणत होते ...

मोहिले : आणखीन ?

मराठे : खूप बरं वाटलं साहेब मला -- आनंद वाटला --

मोहिले : होय -- पण ते आणखी काय म्हणत होते ?

मराठे : शेकडो वर्कर्सवर तुमचा कसा वचक असतो ते कौतुकानं सांगत होते -- पण तुम्ही तितकेच दयाळू कसे आहात तेही सांगत होते --

मोहिले : हं ...?

मराठे : तेवढ्यांत त्यांना कुणाचा तरी फोन आला आणि मलाही निघणं भाग होतं -- मग निघालो मी – तिथं टॅक्सी मिळत नाही -- बसनंच जावं लागतं --

मोहिले : मग आपली कार नेता येत नव्हती ? का परकेपणा वाटला मला विचारायला ?

मराठे : नाही साहेब, तुम्ही कार दिली असती यात शंकाच नाही, पण लोकांत उगीच भलती सलती चर्चा होते .

मोहिले : कसली चर्चा ?

मराठे : ते आता उदाहरणार्थ वायंगणकर वगैरे लोक तुमच्यामाझ्याबद्दल बोलत असतात काहीतरी -- मी तुमचा चमचा आहे -- तुम्हाला खुशामत आवडते -- असलं फालतू काहीतरी बोलत असतात -- अर्थात् मी मनावर घेत नाही म्हणा -- तुमच्यासारख्या चांगल्या माणसाला चांगलं म्हणायला आपल्याला कुणाच्या बापाची भीती नाही --

मोहिले : बघायला पाहिजे म्हणजे त्या वायंगणकरकडे -- बरं, कामात कसा काय आहे तो ?

मराठे : काम करतो हो साहेब -- पण वातावरण असं गढूळ करत राहतो -- आता तुमच्याबद्दल त्यानं असं बोलायला नको होतं --

मोहिले : काय ते ?

मराठे : आता ते सांगणं म्हणजे सुध्दा माझी जीभ विटाळून घेण्यासारखं आहे -- तुम्ही या वर्षी प्लास्टिकची ऑर्डर धरमचंदकडे न देता गोपाळदासकडे दिली की नाही -- तर याचं म्हणणं की तुम्ही या व्यवहारात कमिशन काढलं -- असलं काहीतरी बडबडत असतो ! याचा संबंधच काय म्हणतो मी !

मोहिले : त्याचं काय आहे मराठे, असल्या लोकांना नोकरीतून काढून टाकणं किंवा त्यांना नोकरी सोडायला लावणं तसं कठीण नसतं -- पण हा मार्ग शक्यतो वापरायचा नसतो -- पुन्हा दुसरी काही माणसं असलीच निघतात -- आणि माणसं सारखी काढायचं धोरण ठेवलं तर कंपनीचं रेप्युटेशन खराब होतं -- कामाला बरी अशी माणसं मग शक्यतो त्या कंपनीकडं यायचं टाळू लागतात -- म्हणून डारयेक्टर्सनाही असे मार्ग मनापासून आवडत नाहीत. एका मर्यादेत हे असं चालू देणं भागच पडतं त्यामुळं. पण तुम्ही एक करा. त्याला जरा टॅप करून बघा -- त्याला काय पाहिजे आहे -- कसली इच्छा आहे ते जरा बघा -- आपण खिशात घालून टाकू त्याला --

मराठे : नाही, तुम्ही म्हणताय तर प्रयत्न करतो मी, पण मला काही हे शक्य दिसत नाही. आपला पुढारी पावसकर आहे ना, त्याचा हा जवळजवळ उजवा हात आहे -- त्याच्या जिवावर हा टिवटिव करतो -- आणि ही माणसं साहेब अशी विचित्र असतात की यांना धड स्वत:चं हितही कळत नाही. आणि दुसऱ्याचं चांगलंही पाहवत नाही -- नुसतं वातावरण गढूळ करत राहणं एवढं एकच काम करतात ही माणसं आयुष्यभर -- नुईसन्स ही एकच व्हॅल्यू त्यांना माहीत असते --

मोहिले : अच्छा, यू डोन्ट वरी ! बघू या .

मराठे : काही उपयोग नाही --

मोहिले : हं -- ठीक आहे --

मराठे : आता ते मागण्या मांडायचे वगैरे जे प्रकार सुरू आहेत -- ते लोकांना पटवायचं काम धूमधडाक्यात चालू आहे साहेब -- मुळात इथली युनियन किती तापदायक आहे ते सगळ्या जगाला ठाऊक आहेच --

मोहिले : असू दे मराठे, लढाईला मी घाबरत नाही -- इथलं सगळं वातावरण माहीत असूनही मी इथं आलोय -- माझी त्यांना आठवण राहील -- बघा तुम्ही -- मी पण तसा सोपा नाही -- बरं, निघा तुम्ही -- मी बहुतेक आज येणार नाही -- नाहीतर जमल्यास दुपारी येऊन जाईन -- आणि दुसऱ्यांच्या समोर मी तुम्हाला बोलतो ते मनावर घेऊ नका -- वागावं लागतं असं --

मराठे : बरोबर आहे साहेब -- तुम्ही रागवायचं, आम्ही घाबरायचं यातूनच सगळ्यांच्यावर वचक राहतो. ते मी कधीच तसं लक्षात ठेवत नाही साहेब -- बरं, तुम्ही विश्रांती घ्या आज. बहुतेक दुपारपर्यंत सापडेल तो -- आणि कुठं जाऊन बघून यायचं असलं किंवा काहीही गरज वाटली तर बोलावून घ्या मला.

मोहिले : अच्छा, ठीक आहे.

मराठे : बरं आहे साहेब ! ( जातात. )

( मोहिले रिलॅक्सड् बसतात. अत्यंत काळजीत आणि थकल्यासारखे. नजर न हलवता बसून राहतात. प्रिया अत्यंत छानछोकी पोषाखात येते. ती कॉलेजात चालली आहे. हातात वही-पुस्तक. )

प्रिया : बरंय पप्पा, जाते मी -- आणि काळजी करत बसू नका -- अं ?

मोहिले : हं --

प्रिया : माय डियर, डियर पप्पा ! ( त्यांच्या गालावरून हात फिरवते आणि जाते. मोहिले अविचल बसलेले.. मराठे पुन्हा प्रवेश करतात. मोहिल्यांचे लक्ष जाताच ते मराठ्यांकडे नुसते प्रश्नार्थक पाहतात. )

मराठे : साहेब, जाता जाता एक विचार आला डोक्यात -- म्हणून आलो -- प्रिया कॉलेजात गेली वाटतं -- भेटली मला -- म्हटलं जरा बोलायचं होतं --

मोहिले : बोला --

मराठे : साहेब, म्हणजे असं वाटतंय मला -- पटतंय का बघा -- आता असं आहे की इथली युनियन म्हणजे काय हे जसं तुम्हाला माहीत आहे -- अर्थात तुम्ही घाबरत नाही हे तर आहेच -- तर मला असं वाटतं की, तुम्ही म्हणजे काय हे युनियनला पण माहीत आहे -- तर माझ्या डोक्यात असं आलं की प्रत्यक्ष लढाई सुरू होण्यापूर्वी मुद्दाम तुम्हाला डिस्टर्ब करत राहण्याचे तर डाव नसतील ? म्हणजे उदाहरणार्थ पिट्टू हरवल्यावर तुम्ही डिस्टर्ब झालातच की नाही ?

मोहिले : म्हणजे तुम्हाला काय म्हणायचंय की त्यांनी मुद्दाम त्याला पळवलं असेल ?

मराठे : म्हणजे एक आपली शंका --

मोहिले : हे म्हणजे अमानुष झालं -- इतक्या घाणेरड्या मनोवृत्तीची माणसं आहेत इथं ?

मराठे : साहेब, एकदा शत्रू म्हणून उभं राहिल्यावर कुणाच्या डोक्यात काय येईल ते काय सांगता येणाराय ? -- तुमच्या आधी वेलणकर साहेब होते तर त्यांच्या कारची सगळी चाकंच एकदा पंक्चर करून ठेवली होती -- म्हणजे ते बहुतेक या युनियनवाल्यांचंच काम असणार असा तेव्हाही संशय होताच--

मोहिले : धिस इज टू मच -- आय विल सी दॅट दीज पीपल आर फक्ड प्रॉपरली -- दे विल रिमेंबर मी फॉर एव्हर -

मराठे : त्यातूनही काही अशी बातमी लागते का ते लक्ष ठेवतोच मी --

माहिले : ठीक आहे -- बघू या --

मराठे : जातो साहेब -

मोहिले : हं -- ( मराठे जातात, मोहिले टेन्स बसून. अस्वस्थ. काही क्षणांनी मालती प्रवेश करते. )

मालती : आजचा दिवसच मेला वाईट उगवलाय. सकाळपर्यंत होता पिट्टू आणि अचानक कसा गायब झाला कोण जाणे !

मोहिले : नाही, कदाचित् मराठे म्हणाले ते खरंच असेल -- मुद्दामच पळवला गेला असेल तो -- तो स्वत:हून असा फार लांब कुठं जाणं शक्यच नाही -- उद्या माझी मुलगी पळवतील हे लोक ! ऑल राईट -- मी पण पाहून घेईन -- यांना सरळ केल्याशिवाय सोडत नाही मी आता --

मालती : म्हणजे इतकं अशा पध्दतीनं चालतं इथं ?

मोहिले : घाबरट बोलणं नकोय अजिबात -- या लोकांची ही जी गुर्मी आहे ती उतरवून टाकल्याशिवाय मी राहात नाही -- माझ्याकडेही माझे काही मार्ग आहेत --

मालती : पण मी म्हणते, अशी एकमेकांवर डोकी आपटत न बसता काही मार्ग नाही का निघू शकत ?

मोहिले : का ? कशासाठी ? त्यांची डोकी आपटायची तयारी आहे -- माझी नाही ? बघू या !

मालती : चिडू नका तुम्ही -- पण मी काय म्हणते, आपणही नोकरीच करतोय ना -- स्वत:वर कशाला घ्यायची सगळी जबाबदारी आपण ?

मोहिले : आणि घरात हे तुम्हा बायकांचे शेपूट घालू तत्त्वज्ञानाचे डोस ! नको त्या गोष्टी सगळ्या जमल्यायत भोवती ! लढावं तर लागणारच पण त्याच वेळी आपलीच माणसंसुध्दा टोकरत बसणार ! नको त्या आठवणी येणार ! नको त्या घटना घडत राहणार !

मालती : अहो, रागावू नका असे -- पण --

मोहिले : गप्प बस म्हटलं ना ! यापुढं माझ्या कुठल्याही बाबतीत एक शब्द बोलायचा नाही कुणी घरात – बोललात तर याद राखून ठेवा --

मालती : बरं बाई, राहिलं -- ( आत जात-- ) तो पिट्टू तरी निदान सापडला एकदाचा तर बरं होईल -- ( जाते. मोहिले टेबलावर मूठ आपटतात. पिट्टू हरवल्याच्या अस्वस्थतेला अशी हतबल अभिव्यक्ती दिली गेल्याने एक प्रकारचा पराभूत वैताग. काही क्षण बसून राहतात. मग सहजच लक्षात आल्याप्रमाणे उठतात. कुठलीतरी वस्तू सरकावून पाहतात. तिथे काही नसते. हताश उभे राहतात. धोंडी, बाहेरून येऊन सावकाशपणे आत जाऊ लागतो. )

मोहिले : घोंडी --

धोंडी : जी --

मोहिले : नाही सापडत ?

धोंडी : नाही जी अजून --

मोहिले : हरवलाच कसा पण ? तू काय करत होतास ? सकाळी कुणी आलं होतं इकडे ? तुझं लक्षही नसेल --

धोंडी : कुणी नव्हतं आलं --

मोहिले : ( ओरडत -- ) शोधतोयस का नाटक करतोयस ? कुठल्याही परिस्थितीत आज संध्याकाळच्या आत पिट्टू सापडला पाहिजे -- नाहीतर बघतो तुझ्याकडे -- लाडावत चाललाय तुम्ही लोक --

धोंडी : ( जवळजवळ रडू फुटत --) नाही जी -- नाही जी -- लई प्रेमानं वागतो जी मी -- ( रडायला लागतो. मोहिले भयंकर अस्वस्थ --)

मोहिले : बरं, जा -- सापडत नाही म्हणून शोधायचं थांबायचं नाही -- जा ! ( धोंडी डोळे पुसत हळूहळू जातो. मोहिले उभे. नंतर धोंडी आतनं पिशव्या घेऊन येतो आणि बाहेर जातो. अंधार होत जातो -- पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा दिवस तोच -- दुपारची वेळ. मालती एक मासिक चाळत बसलेली आहे. काही क्षणांनी प्रिया येते.)

प्रिया : ( हातातली पुस्तकं ठेवून येत --) सापडला का ?

मालती : नाही अजून -- काही कळत नाही. ते घरीच आहेत आज. गेल्या काही वर्षांत ते असे घरी थांबलेले असं काही आठवत नाही मला. तब्बेत बरी नाही म्हणून आज येणार नाही असा फोन केला त्यांनी सकाळी.

प्रिया : मम्मी हे जरा जास्तच होतंय असं नाही वाटत तुला ? काय हे उगीचच !

मालती : स्वभाव आहे. आधी काही वर्षं त्या मोती कुत्र्याचं असंच होतं. तो वारल्यानंतर काही महिने घरातलं कुणीतरी गेल्यासारखे गेले. आता कुठलाही प्राणी पाळायचा नाही -- तो गेला तर फार त्रास होतो असं तेव्हा म्हणत होते. तरीही एका सिंधी माणसानं हा पिट्टू दिला त्यांना. मुक्या प्राण्यांवर भयंकर जीव लावतात !

प्रिया : मला नाही वाटत आता तो सापडेलसं --

मालती : पण बोलू नकोस असं -- संतापतील ते -- ( काही क्षणांनी --) मला तर कधीकधी वाटतं की ते मुके प्राणी माझ्यापेक्षा श्रेष्ठ आहेत -- कित्ती प्रेम मिळतं त्यांना -- आणि तसं म्हणशील तर गेला तर गेला -- नाहीतरी त्याचं आयुष्य वर्ष दीड वर्षाचंच असतं म्हणे --

प्रिया : मम्मी हा जर एखादा इंग्लिश पिक्चर असता नं तर शेवटी असं दाखवता आलं असतं की मत्सरापोटी किंवा असूयेपोटी तूच पिट्टूला अनकॉन्शसली म्हणजे एका विचित्र मन:स्थितीत मारलेलं असतंस -- पण तुला त्याचं भान नसल्यानं तुला ते माहीत नसतं--

मालती : बये ! कल्पनासुध्दा बोलू नकोस असली !

प्रिया : पण पप्पांनी जर हत्ती पाळलेला असता तर त्याला असं नकळत मारणं तुला जरा अवघड गेलं असतं ! ( हसते. )

मालती : मला याच्याहून क्षुद्र वाटण्यासाठी आता खरं तर त्यांनी एखादं झुरळ पाळायला हवंय आता -- किंवा एखादा ढेकूण ! म्हणजे मी त्याच्याहून क्षुद्र !

प्रिया : पप्पांना भांडायची खुमखुमी फारच आहे -- खिमजी क्लॉथमधे केवढं झालं ते -- आणि आता ही सुपर इंजिनियर्स -- इथं तेच होणार --

मालती : मलासुध्दा कंटाळा आलाय याचा -- मी फारसं काहीच करत नसले तरी गोंधळ वाटत राहतो सगळा – सारखं त्रासल्यासारखं वाटत राहतं --

प्रिया : मम्मी, खरं तर पप्पा मला फार आवडतात -- पण ते सारखं बायका बायका म्हणून चिडतात त्याचा अगदी वैताग येतो --

मालती : तुझा भाऊ वारला आणि तुझ्यानंतर मूलच नाही -- ते एक कायमचं मनात सलतंय त्यांच्या -- काय करावं काही कळत नाही -- त्यात आणखी आता हा पिट्टू हरवलाय -- त्यांना अशी शंका आहे की यात कुणाचा तरी हात आहे --

प्रिया : ह्यॅ ! यात कसला कुणाचा हात असणार ! काहीतरीच !

मालती : मलासुध्दा तसंच वाटतं -- चुकून गेला असेल इकडं तिकडं -- आणि शेवटी उंदराचीच जात -- बागेत एखाद्या बिळातसुध्दा गेला असेल -- पण त्यांच्या सुखदु:खाची कुणाला फिकीर नाही असं म्हणतायत -- ( फोनची रिंग वाजते, प्रिया उठते आणि फोन घेते. ).

प्रिया : ( फोनवर -- ) हॅलो -- होय -- मी प्रिया बोलतेय, मुलगी त्यांची -- हं हं -- एक मिनिट हं -- मी सांगते त्यांना – होय -- तब्बेत बरी नव्हती म्हणून गेले नाहीत आज -- एक मिनिट -- ( तेवढ्यात मोहिले बाहेर आलेले -- फोन पाहण्यासाठीच --) पप्पा, तुमचा फोन -- डायरेक्टर कुरेशी बोलतायत -- ( मोहिले तिच्याकडून फोन घेतात --)

मोहिले : हॅलो -- गुड आफ्टरनून ! होय -- नाही, तसं विशेष काही नाही -- किरकोळ ताप वगैरे -- हं – हं -- बरं -- नाही, मी घरीच आहे -- ऑल राईट सर – होय -- मी वाट पाहतो -- हं-- ( फोन ठेवतात. मग --) डायरेक्टर कुरेशीसाहेब संध्याकाळी घरी येतायत.

मालती : सहजच ना ?

मोहिले : आता मला काय माहीत ? काम आहे म्हणाले काहीतरी -- बघू --

मालती : बरं का -- मला एक अशी शंका आहे की तो बागेतल्या एखाद्या बिळात गेला असेल -- धोंडीला बघायला सांगावं --

मोहिले : नको -- मी विचार केला त्याचा -- नको. आता शोधायचं नाही त्याला -- सगळी बिळं उकरून बघत बसलो आपण तर, मुद्दामच एखाद्यानं हा प्रकार केला असेल तर आनंद वाटेल त्याला -- सहज सापडला तर ठीक आहे -- आटापिटा बंद -- तो विषय सोडून दिल्यासारखं वागा --

मालती : कसं नेमंक दुर्लक्ष झालं असेल -- ( सुस्कारून -- ) जरा नीट लक्ष राहिलं असतं तर हरवला नसता --

माहिले : ( चिडून-- ) मी काय सांगितलं ते कळलं का ? घरातसुध्दा खंत करत बसल्याचं वातावरण नकोय – माझ्या शत्रूच्या कारवाईला कुणीसुध्दा थोडंसुध्दा बळी पडता कामा नये --

मालती : ( उठून आत जात -- ) आम्ही कसं वागावं असं तुम्हाला वाटतं ते आधी सांगत चला घरात -- म्हणजे आम्ही तसं वागत राहू -- ( जाते. )

मोहिले : वैताग आहे !... छोट्या छोट्या गोष्टींनीही उद्ध्वस्त होतायत ! ठीक आहे. मी एकटा तोंड देईन याला – आय विल फेस इट अलोन !

प्रिया : पप्पा, माझं मत सांगू का -- तुम्ही स्वत:च जास्त त्रास करून घेताय असं मला वाटतंय --

मोहिले : नाही, नाही प्रिया -- पिट्टू हरवल्याचं काही नाही -- पण तुम्ही सगळे ज्या पध्दतीनं वागताय त्याचा मला त्रास होतोय --

प्रिया : आता आम्हाला कसं कळणार तुमचं बदलत चाललेलं ?

मोहिले : च् च् च् ! हे काय होतंय कळतंय का तुला ? माझ्या एखाद्या भित्र्या शत्रूनं उंदीर पळवून माझ्यावर सापळा टाकलाय आणि तुम्ही सापडताय त्यात ! त्यामुळं तो यशस्वी झाल्यासारखं चित्र तयार होतंय -- त्या सापळ्यात आपल्यापैकी कुणीही जायला नकोय --

प्रिया : ठीक आहे -- विषयच सोडून देऊ या मग तो -- तुम्हाला झालेल्या दु:खात आम्ही समरस होत होतो इतकंच -- जाऊं दे --

मोहिले : ( संतापून-- ) मला दु:ख झालेलं नाहीय ! कळलं ?!

प्रिया : ठीक आहे -- ( आत जाते -- मोहिले वैतागून बसलेले. धोंडी बाहेरून येतो. आत जाऊ लागतो -- )

मोहिले : धोंडी --

धोंडी : ( थांबून -- ) चिक्कार शोधिलं साहेब -- अजून --

मोहिले : (ओरडतात --) नको म्हणून सांगितलं ना ! चालता हो ! पुन्हा हा विषय काढायचा नाही -- ( धोंडी विनाकारण मार खाल्ल्यासारखा जातो. म्हणजे आता शोधायचं की खरंच शोधायचं नाही हे त्याला कळतच नाही. जाण्याआधी एकदा वळून पाहतो आणि मग जातो..)

मोहिले : ( स्वगत -- ) म्हणजे कुणीच नाही आता ... कुणीच नाही.. आपले म्हणावे तेसुध्दा असे कुरतडत राहणार... एकट्यालाच लढलं पाहिजे मला – एकट्यालाच -- पिट्टू...पिट्टू... तूच खरोखरचा साथीदार

होतास माझा ... आता तूही नाहीयस... तू हरवल्यानंतरच्या या प्रसंगात  आता मला तुझी साथ नाही ... पण....हार नाही जाणार मी ... एकटा लढेन मी... ही काय माणसं आहेत ? भित्रे उंदीर साले -- उंदीर पळवतायत !... तू उंदीर नव्हतासच पिट्टू ... त्याहून खूप काही होतास ... आणि तरीही .. प्रसंग असा आहे की तू हरवल्यावर तुझा शोध घेणंही अपमान ठरावा... तू नाहीसा झाल्याचं दु:खही वाटून घेता येऊ नये ... तुझ्या डाव्या डोळ्याखालचा तो काळा तीळ !... तो तीळ नसता तर तू तू नसतात पिट्टू आणि  मी मी नसतो -- सगळं जग एक वेगळंच काहीतरी राहिलं असतं -- वेगळंच ... ( भावविवश होत --) तुझ्या प्रेमाशिवाय -- पिट्टू -- जगणं कठीण आहे रे मला -- ( जवळजवळ रडत --) किती गरीब दिसायचास तू -- किती मऊ ! -- चुकून जरी हात जरा जास्त दाबला गेला असता तरी तुझा प्राण गेला असता....तुझ्या डाव्या डोळ्याखालचा तो काळाभोर तीळ तरी मला देऊन जा पिट्टू .. तीळ तरी देऊन जा ...(हात टेबलावर टेकतात... नंतर भानावर आल्याप्रमाणे --) नाही...असं नाही चालणार ...हरवलेला नाहीय तो... आहे तो... तो असल्यासारखंच वागावं लागेल...त्याच्यामुळं मी पराभूत झालो तर त्यालाही आवडणार नाही ते ... नाही... असं नाही होऊ देणार मी ...( सावकाश...) असं...नाही...होऊ...देणार..

(शांतता... काही क्षणांनी शिंदे येतात. त्यांच्या हातात काही कागद आहेत.)

शिंदे : नमस्कार --

मोहिले : हं--बोला शिंदे -- काय आणलंयत --

शिंदे : सापडला ?

मोहिले : ते जाऊ दे -- बोला --

शिंदे : पावसकर, वायंगणकर आणि इतर बरेच कामगार रेप्रेझेंटेशन घेऊन आले होते -- त्यांना तुम्हाला भेटायचं होतं -- पण तुम्ही नव्हता म्हणून ते माझ्याकडे आले --

मोहिले : -- हं -- ?

शिंदे : त्यांनी या मागण्या दिल्यायत -- ( ते कागद मोहिल्यांना देतात -- ) संतापून बोलत होते --

मोहिले : ( कागद पाहून --) नाही ! या विषयावर सगळं झालेलं आहे -- धिस इज माय प्रॉव्हिन्स ॲन्ड आय विल नॉट टॉलरेट एनिबडीज इंटरफिअरन्स -- यात विचार करण्यासारखं काही नाही --

शिंदे : बरोबर आहे साहेब -- त्यांनी यात ढवळाढवळ करायचा प्रश्नच नाही -- ( क्षणभरानं --) धमक्या देत होते --

मोहिले: : काय म्हणत होते ?

शिंदे : तसं विशेष नाही -- हे खिमजी क्लॉथ नाही -- हे सुपर इंजिनियर्स आहे -- असं म्हणत होते --

मोहिले : वस्तुस्थितीचं वर्णन म्हणून त्यांचं म्हणणं बरोबर आहे -- मी म्हणजे काय आहे ते जाणून

घ्यायची उत्सुकता दिसतेय त्यांना --

शिंदे : तुमची तब्बेत बरी नसल्यामुळं तुम्ही आलेला नाहीत असं मी सांगितलं तर हसले ते -- ते भेटायला येणार हे तुम्हाला कळलं असेल आणि त्यामुळं घाबरून तुम्ही मुद्दामच आला नसाल अशा कॉमेंट्स करत होते --

मोहिले : अरे हुड् ! चला, आत्ता जाऊ या !

शिंदे : नाही, हरकत नाही, पण हे जरा जास्त महत्त्व दिल्यासारखं होईल त्यांच्या बोलण्याला ! एवढी काही आवश्यकता नाही -- विश्रांती घ्या तुम्ही -- अजून सापडला नाही म्हणजे आश्चर्य आहे पण !...

मोहिले : ते जाऊ द्या हो -- त्याचं काही विशेष नाही -- एक आपला पाळला होता आवडीनं इतकंच -- पण लढाई नीट होईल -- मी कच खाईन असं कुणी समजायचं कारण नाही -- नीट होईल सगळं --

शिंदे : नाही तसं नव्हतं म्हणायचं मला -- ऑल राईट-- जाऊ साहेब --?

मोहिले : हं ---

शिंदे : बरंय साहेब -- ( जातात. )

मोहिले : ( स्वगत -- ) आता कुरेशी साहेब येतील पिट्टू ..लढाई सुरू करण्यापूर्वी या लोकांचे आशीर्वाद लागतील -- ते मिळतीलच -- मला इथं घेताना माझी प्रसिध्दी त्यांना माहीत होतीच..उलट त्यामुळंच इथं घेतलं गेलंय मला .. मी माझं काम करीनच .. कदाचित् माझ्यामुळंच तुझ्यावर काही संकट आलं असेल पिट्टू .. मला क्षमा कर ... ( काही क्षण जातात. काही काळही गेल्याचे सूचित करावे. ) बाहेर गाडी थांबल्याचा आवाज आणि हॉर्न... जरा लगबग --) धोंडी ऽ ऽ ए धोंडी ऽ .......

धोंडी : ( बाहेरून --) जी आलो -- ( येतो. ) जी --

मोहिले : साहेब आलेले दिसतायत -- बाईंना त्यांना जरा रिसीव्ह करायला सांग -- मी आलोच -- ( ते जातात. धोंडी आत जातो. मग मालती आणि धोंडी बाहेर येतात. तोपर्यंत कुरेशीसाहेब येतात.)

कुरेशी : हॅलो मिसेस मोहिले --

मालती : हॅलो ! या सर, बसा -- हे येतायत इतक्यात --

कुरेशी : ( बसत -- ) हं, कसं काय वाटतंय इथं --

मालती : छान आहे साहेब सगळं !

कुरेशी : मुलगी आहे नाही का एक तुम्हाला ?

मालती : हो -- आहे ना आत -- ( आतल्या बाजूकडे जात -- ) प्रिया, ए प्रिया ऽ --

कुरेशी : नो नो, डोंट डिस्टर्ब हर -- ( पण प्रिया येतेच.) हॅलो --ही काय !

प्रिया : हॅलो -- ( मोहिले येतात.)

मोहिले : हॅलो -- सॉरी सर -- ( धोंडीकडे पाहतात. तो आत जातो. )

कुरेशी : ऑल राईट -- मुलगी मोठी स्मार्ट दिसतेय तुमची -- ( बाकीच्यांच्या चेहऱ्यांवर स्मित --) छान,छान !

मालती : आलेच हं -- ( सस्मित आत जाते. )

मोहिले : बी.ए. ला आहे ती -- इंग्लिश प्रिन्सिपल --

कुरेशी : बापरे ! म्हणजे पुष्कळ वाचत असणार ही ! छान, छान !

प्रिया : जाऊ मी ?

कुरेशी : बाय ऑल मीन्स ! सॉरी फॉर द ट्रबल !

प्रिया : ( सस्मित -- ) नो सर -- ( जाते. )

कुरेशी : व्हेरी स्मार्ट गर्ल -- अं !

मोहिले : आपण आज इकडे आलात त्याचा फार आनंद वाटला साहेब --

कुरेशी : हं -- मी फोन केला होता तर तुम्ही घरीच आहात असं कळलं -- पण काम तसं जरा होतं -- म्हटलं भेटूनच यावं --

मोहिले : हं --

कुरेशी : तसं फार मनावर घेण्यासारखं नाही -- पण तुम्हाला माहिती असावी इतकंच --

मोहिले : बोला साहेब --

कुरेशी : इन्कमटॅक्स ऑफीसकडे माझ्याविरुध्द तक्रार करणारं एक पत्र गेलं होतं -- काही तपशीलही दिलेला होता त्यात -- आणि तक्रार करणाऱ्याचं नाव म्हणून तुमचं नाव टाईप केलेलं होतं -- तसं मिटलंय ते सगळं -- हे मुद्दाम कुणीतरी केलंय हे उघडच आहे -- ते मिटलंय सगळं --पण नाव तुमचं होतं तर म्हटलं तुम्हाला निदान माहिती दिली पाहिजे --

मोहिले : आश्चर्य आहे !

कुरेशी : तुमच्याशी वैयक्तिक शत्रुत्व धरून वागणारा असा कुणी आहे काय ?

मोहिले : मला तर काहीच लक्षात येत नाहीय --

कुरेशी : नो, नो -- डोंट टेक इट अदरवाईज ! फक्त तुम्ही जरा जागरूक राह्यची गरज आहे असं मला वाटतं -- असा कुणी माणूस लक्षात आला तर बघा --

मोहिले : तसे तर म्हणजे पुष्कळच असतील, पण ... बरं, त्यात अगदी तपशील दिलेले होते ?

कुरेशी : ते तपशील असे होते की ते तुम्हाला माहीत असणं शक्यच नाही -- मला खात्री आहे -- तो प्रश्न नाही -- मुख्य म्हणजे इट इज ऑल ओव्हर --

मोहिले : लक्ष ठेवावं लागेल --

कुरेशी : दुसरं एक आहे --

मोहिले : हं --

कुरेशी : माझ्याकडे, तुमच्याबद्दल एक असंच टाईप केलेलं पत्र आलं आहे -- ' एक स्त्री कर्मचारी ' या नावानं – फॅक्टरीतल्या स्त्री कर्मचाऱ्यांशी तुमचं वागणं सभ्यपणाचं नाही असं त्यात लिहिलंय. आणि हे दोन्ही उद्योग करणारा माणूस एकच असणार हे मात्र नक्की --

मोहिले : पण साहेब --

कुरेशी : तुमच्या वागणुकीचे हवाले नकोयत मला मिस्टर मोहिले -- मला वस्तुस्थिती माहीत आहे. मुळात मला त्यात इंटरेस्टही नाही. आणि काही किरकोळ गोष्टी असल्या तरी आय डोंट बॉदर ! अर्थात् तसं काही नाहीच आहे हे मला माहीत आहे. हा म्हणजे फक्त तुम्हाला मनस्ताप देण्याचा प्रयत्न आहे -- बस्स् !

मोहिले : नाही, मी हवाले देत नाही -- पण मी लक्ष ठेवीन -- तो माणूस लक्षात आला तर आय विल सी दॅट ही रिपेंटस फॉर धिस !

कुरेशी : आणखी एक म्हणजे या युनियनच्या लोकांच्या हालचालीही वाढत चालल्यायत -- अर्थात् हे त्यांच्यापैकी कुणाचं काम असेलसं मला वाटत नाही -- ओरडून भांडणारे बावळट लोक आहेत हे -- त्यांना हे सुचेलसं मला वाटत नाही -- तुम्हाला काय वाटतं ?

मोहिले : तसं अंदाज करणं अवघड आहे -- ( मालती सरबताचे ग्लास सस्मित मुद्रेनं आणते. )

कुरशी: : अरे, कशाला त्रास घेतला मिसेस मोहिले ?

मालती : त्रास कसाला त्यात --

कुरेशी : कामाधामाच्या दोन गोष्टी बोलायच्या होत्या जरा साहेबांशी -- म्हटलं जाऊन यावं --

मालती : हं हं -- चालू द्या -- आलेच. ( जाते. मोहिले कुरेशीना एक ग्लास देऊन एक स्वत: घेतात. )

कुरेशी : ही युनियन म्हणजे एक ताप आहे इथं -- एकूण एक कामगार सभासद् आहेत -- शिवाय मधूनमधून बाहेरचे लोकही येतात.

मोहिले : या बाबतीत माझी एक विनंती आहे साहेब -- यू गिव्ह मी फ्री हॅन्ड -- मी बरोब्बर हाताळतो सगळं -- ही गुर्मी खलास करून टाकू आपण -- युनियनचे तुकडे करणंही तसं कठीण नाही -- आपण सरळ असतो तोपर्यंतच यांच्या उड्या असतात -- आपण जरा यात इंटरेस्ट घ्यायला लागलो की दाणादाण होते यांची -- अनुभव आहे माझा -- फक्त गरज पडल्यास जरा दीर्घकाळ संघर्षाचीही तयारी ठेवावी लागेल -- त्यासाठी पहिलं काम -- लढाईची सुरुवात म्हणून एकूण वातावरण चिघळवावं लागेल -- यातून पुढं मग क्रिया प्रतिक्रियांची साखळी होईल --

कुरेशी : तुम्हाला ते स्वातंत्र्य आहे मिस्टर मोहिले -- तुम्हाला इकडे घेताना आमची चर्चाही झाली होती या बाबतीत -- आमच्या बाबतीत तुम्ही निश्चिंत राहा -- फर्मच्या भल्यासाठीच तुम्ही काही चांगल्या गोष्टी करू इच्छिता याचा उलट आनंदच आहे आम्हाला -- मुख्य म्हणजे यू आर केपेबल -- त्यामुळं ठीक आहे --

मोहिले : आभारी आहे साहेब -- हे फ्रीडम पाहिजेच -- नमून घाबरून राहणं स्वभावातच नाही माझ्या --

कुरेशी : आय नो, आय नो !

मोहिले : फक्त या पत्रांचा एक तुम्हाला त्रास झाला --

कुरेशी : नेव्हर माईंड -- अच्छा -- निघतो -- विश यू बेस्ट लक -- ( उठतात. )

मोहिले : ए, मालती, साहेब चालले बरं का --

मालती : ( सस्मित बाहेर येते -- ) निघालात ?

कुरेशी : हं निघतो आता -- साहेब मधून मधून येतात आमच्याकडे -- म्हटलं आज आपण जाऊन यावं --

मालती : ( हसत --) हं,हं --

कुरेशी : अच्छा ! गुड नाईट !

मोहिले : गुड नाईट !

मालती : अच्छा ! गुड नाईट ! ( कुरेशी जातात. )

मोहिले : निनावी पत्रं पाठवतायत ! हिजडे साले !

मालती : कोण ? कुणाबद्दल ?

मोहिले : नाही. काही नाही. ( मालती क्षणभर पाहते आणि आत निघून जाते. मोहिले जखमी झाल्यासारखे बसून राहतात. प्रिया एका दारातून शीळ वाजवत येते. थबकते, पाहते, आणि दुसऱ्या दारातून आत जाते. नंतर धोंडी येतो.)

धोंडी : साहेब, मराठे साहेब आलेत !

मोहिले : हं -- ( धोंडी जातो. मराठे आत येतात. )

मराठे : मघाशी येउन गेलो एकदा -- तेव्हा कुरेशीसाहेब इथं आल्याचं कळलं, म्हणून म्हटलं मग जरा वेळानंच यावं --

मोहिले : हं --

मराठे : एक बातमी कळली साहेब -- ( मोहिले नुसते पाहतात.) म्हणजे संध्याकाळीच कळलं -- म्हटलं तुम्हाला कल्पना द्यावी -- म्हणून आलो --

मोहिले : हं, बोला बोला --

मराठे : मला असं कळलंय की उद्या तुम्हाला ते घेराव घालणार आहेत --

मोहिले : ( हसून -- ) ही बातमी होय ? ठीक आहे.

मराठे : म्हणजे साहेब, तुम्हाला ताबडतोब कल्पना देऊन ठेवणं महत्त्वाचं वाटलं मला --

मोहिले : तुम्हाला महत्त्वाचं वाटलं ते बरोबर आहे मराठे -- त्यात काही चूक नाही --

मराठे : पिंटूचा काही पत्ता लागलाच नाही ना शेवटी ?

मोहिले : पिट्टू हरवल्याचं मनाला लागलंयसं दिसून उपयोग नाही मराठे -- आणि म्हटलं तर आणखीही काही गोष्टी घडल्यायत --

मराठे : कोणत्या साहेब ?

मोहिले : निनावी पत्रांचे घाणेरडे प्रकार सुरू झालेत -- अर्थात याची कुठं वाच्यता होता कामा नये -- पिट्टू हरवल्यानं मन:स्थिती बिघडली आहेच -- तुम्हाला विश्वासात घ्यायला काही वाटत नाही मला --

मराठे : मी या विश्वासाला पात्र असल्याचं पटेल साहेब तुम्हाला -- बघा तुम्ही --

मोहिले : तो प्रश्नच नाही ...असो.. तर आपल्या काही बाबतींत आणि विशेषत: कुरेशीसाहेबांबद्दल नीट माहिती जमवू शकणाऱ्या माणसानं हे उद्योग केलेले आहेत.--

मराठे : साहेब, आता बोलावं की नाही तेच कळत नाहीय पण रागावणार नसाल तर बोलतो --

मोहिले : बोला --

मराठे : ( इकडे तिकडे पाहून जरा खालच्या आवाजात --) या बाबतीत साहेब, मला जरा शिंद्यांचा संशय येतोय -- त्यांना तुमचा जरा मत्सर वाटतो असं मला काही वेळा दिसून आलेलं आहे -- एक दोनदा तुमच्याबद्दल कुत्सित कॉमेन्टस् करून हसले होते ते -- म्हटलं ते तुम्हाला असिस्ट चांगलं करतायत आणि तुमचीही तशी त्यांच्यावर मर्जी आहे असं समजत होतो मी --

मोहिले : अच्छा ! बघू !

मराठे : तुमच्याशी नीट बोलताना दिसतात ते पण त्याचबरोबर वायंगणकर, पावसकरही कधीकधी त्यांच्या केबिनमधे बोलत बसलेले दिसतात.

मोहिले : असा उघडउघड विश्वासघात कुणी करत नसतं मराठे -- आणि शिंदे बिलाँगस टु द मॅनेजमेंट -- हे त्यांना विसरता येणार नाही -- आणि मॅनेजमेंटमधे असा एखादा माणूस जो कामगारांशी थोडीफार जवळीक साधू शकेल -- असलेला बरंच असतं -- कधीकधी हे उपयोगी पडू शकतं -- पण वैयक्तित माझ्याबद्दल जे काय त्यांचं असेल ते मी बघून घेईन.

मराठे : बरं, जाऊ साहेब ? जेवायचं असेल तुम्हाला --

मोहिले : हं --

मराठे : ( जावं की न जावं अशा संभ्रमात, पण बोलतातच --) साहेब, आणखी एक म्हणजे, बोलावं की नाही याच्या जरा विचारातच होतो -- पण आज हे बोललंच पाहिजे असंही वाटतंय --

मोहिले : बोला हो तुम्ही मराठे -- घाबरू नका --

मराठे : साहेब -- म्हणजे जरा प्रियाबद्दल आहे -- ( मोहिले झटकन सावध होतात - ) म्हणजे तसं विशेष काही नाही, पण तिचा जो एक कॉलेजातला मित्र आहे, त्याला मी दोन तीनदा वायंगणकर बरोबर पाहिलेलं

आहे -- म्हणजे मला त्याची काहीच माहिती नाही हं -- हे मी आधीच सांगून ठेवतो -- पण वायंगणकरशी जवळीक असलेला मुलगा आपल्या प्रियाचा मित्र असावा, हे जरा खटकलं मनाला -- असो -- बरं, जाऊ साहेब ?

मोहिले : हं -- ( मराठे जाऊ लागतात. मोहिले पाहताहेत. ते पुन्हा काही बोलण्यासाठी वळताहेत असं पाहून --) बास आता -- बाकीचं उद्या बोलू --

मराठे : नाही -- फक्त ‘ बरंय साहेब ‘ म्हणत होतो--

मोहिले : हं बरंय – ( मराठे जातात. पुन्हा येतात. )

मराठे : साहेब --

मोहिले : काय ?

मराठे : ते पिट्टूचं डोक्यातून काढून टाका साहेब आता -- आधीच पुष्कळ व्याप आहेत तुम्हाला --

मोहिले : होय --

मराठे : बघा, आमच्या मांजराचं अजून पटत असलं तुम्हाला तर -- नाही म्हणजे --

मोहिले : नकोय, मराठे, नकोय. तमच्या प्रेमाचा अनादर करायची भावना नाहीय माझी.

मराठे : नाही साहेब, तसं मला कधीच वाटलं नसतं -- जाऊ ?

मोहिले : हं --

मराठे : बरंय साहेब --

मोहिले : हं -- बरंय -- ( आता मात्र मराठे जातात. )

मालती : ( काही क्षणांनी प्रवेश करून -- ) जेवायला चलायचं ?

मोहिले : मला भूक नाहीय --

मालती : जरा दोन घास खाऊन घेतलेत तर बरं वाटेल --

मोहिले : म्हणजे पिट्टू हरवलाय त्यामुळं मी जेवत नाहीय, असं समजतेस काय तू ?

मालती : तसं कुठं म्हणतेय मी --

मोहिले : आता उद्यापासून लढाई सुरू होतेय -- आता घरातला तरी ताप बंद ठेवा थोडे दिवस -- बायकी भित्रटपणा अजिबात नकोय --

मालती : आम्हाला तुम्ही हे काही सांगूही नका आणि याबद्दल आम्हाला बोलायलाही लावू नका --

मोहिले : ( चिडून -- ) असं होऊ शकणार नाही -- एक घर आहे म्हणजे बोललं जाईलच -- असं सुखात परकं नाही राहता येणार तुम्हाला -- स्वभाव बदलून वागावं लागेल स्वत:चा -- तुम्हाला काय पटतं, काय वाटतं याचा प्रश्न नाही -- कळलं ?

मालती : पंचेचाळीस वय आहे माझं -- आता कसला स्वभाव बदलतोय -- शक्यतो एकमेकांना समजून घेतच

काढावे लागतील यापुढचे दिवस -- मला काही तुमचं हे असलं आवडत नाही आणि आवडणारही नाही -- तुम्ही उगीचच तेढ वाढवता असं वाटतं मला --

मोहिले : ( जवळजवळ ओरडतातच --) घरात हे असले कुरतडण्याचे प्रकार नकोत म्हणतोय ना ! काही समजतं की नाही तुला -- ( मालती जरा दचकते. डोळे विस्फारून पाहते. निष्कारण आपल्याला बोलणी खावी लागल्याची चीड. )

मालती : ( रागानं आत निघून जात --) तो पिट्टू हरवल्यापासनं तोल गेलाय मनाचा तुमच्या -- आमच्यावर चिडून काय उपयोग ? ( जाते. मोहिले भयानक अस्वस्थ. आतून मालतीच्या हुंदक्यांचा आवाज येतो. मोहिले टेबलावर धाडधाड मूठ आपटतात.)

मोहिले : स्टॉप इट ! स्टॉप इट !! स्टॉप इट !!! ( भयंकर त्रासदायक शांतता. आवाज ऐकून प्रिया येते. थबकते. शांतपणे पाहात उभी राहते. मग मोहिल्यांच्या जवळ येते. त्यांच्या खांद्यावर हात ठेवते. )

प्रिया : टेक इट ईझी पप्पा ! किती त्रास करून घेता तुम्ही -- अं --

मोहिले : ( तिचा हात बाजूला करून --) नुसत्या बायका आहात तुम्ही घरात -- बायका नुसत्या -- आणि तू ... तुझ्याशी मला काही बोलायचं आहे .. पण ... उद्या ...

प्रिया : ठीक आहे पप्पा -- ठीक आहे -- झोपताय का तुम्ही आता -- अं --

मोहिले : नाही ... काहीही झालेलं नाहीय मला ... काहीही झालेलं नाहीय .. जा तू .. मला झोपायचं तेव्हा झोपेन मी .. ( प्रिया क्षणभर पाहते आणि जाते. एकदम अंधार होतो आणि लढाई-सूचक तडाखेबंद संगीत सुरू होते. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा मोहिले रुबाबात उभे असून त्यांना लढाईवर जाणाऱ्या सरदाराचा पोषाख चढवला जातो आहे. पोषाख चढवण्याचे काम कुरेशी, शिंदे, मराठे आणि धोंडी करताहेत. सगळ्यांच्या चेहऱ्यांवर स्मित ... मोहिल्यांच्या चेहऱ्यावरही विजयाचा आत्मविश्वास असलेले स्मित ... संगीत आणि हालचाली जोरदार ... थोड्याच वेळात पोषाख चढवणे, तलवार लटकावणे, शिरस्त्राण घालणे इत्यादी पूर्ण होते. मग मोहिले दोन्ही हात उंचावून -- ‘ एक मिनिट-- एक मिनिट --’ असं म्हणतात. संगीत, हालचाली थांबतात. क्षणभर रिकामा. मग: ‘ हं - आता -- माझ्या डाव्या डोळ्याखाली एक काळा तीळ काढा --’ असं म्हणतात. मराठे पुढे येऊन तसा एक तीळ काढतात. ‘ हं -- चला ! ’ -- मोहिले म्हणतात. संगीत पुन्हा सुरू.. त्या तालावर सगळे जातात. मालती आणि प्रिया हे दृश्य पाहात कडेला उभ्या... संगीत चालूच ... त्या एकमेकींकडे पाहात असतानाच पडदा पडत जातो ...)

--- **अंक पहिला समाप्त** ---

**--- अंक दुसरा ---**

पडदा उघडतो तेव्हा धोंडी आणि मालती मोहिल्यांना ऑफीसला जाताना लागणाऱ्या एकेक वस्तू - कोट,टाय,बूट देत आहेत. मोहिले बसून मोजे-बूट घालताहेत. मराठे अस्वस्थ उभे. प्रिया एका कडेला बसून नुसती शांतपणे पाहते आहे. आपला एकूण या दृश्याशी जणू संबंधच नसल्यासारखी ती परकेपणाने पाहते आहे. बूट घालून झाल्यावर मोहिले टाय नीट करतात. ब्रीफकेस उचलतात. ती धोंडी घेतो. मोहिले मराठ्यांकडे पाहून ' हं- चला ।' म्हणतात. मोहिले आणि मराठे बाहेर पडतात. धोंडी ब्रीफकेस घेऊन मागोमाग जातो. ते गेल्यावर मालती नि:श्वास टाकत अंग टाकून दिल्याप्रमाणे बसते. काही क्षण शांतता.

मालती : पुन्हा सुरू झालं सगळं. ( प्रिया काही बोलत नाही. ) आता पुन्हा चडफड वाढत जाईल. कसंही वागलं तरी पटायचं नाही त्यांना. नुसतं हिडिसफिडिस करत राहतील सारखे. मी म्हणजे दुसऱ्या रूपात ते स्वत:च असायला पाहिजेत असं वाटतं त्यांना. त्यांच्या मनातले सगळे विचार ओळखून सारखं वागायचं ! कसं शक्य आहे ? मुळात हजारदा सांगितलं, असली भांडणं वाढवत जाऊ नका, पण नाही. तुला त्यातलं काही कळत नाही, म्हणायचं ! स्वत:चे हाल, दुसऱ्यांचे हाल ! युनियनला नमवून मालकांचं हित साधून दिलं की मालक खुश होतात म्हणे ! यांचं महत्त्व वाढतं ! आणि घराचा सगळा नायनाट होतो त्याचं काय ? आम्ही काय माणसं नाही ?... आम्हाला मन नाही ?... ( प्रिया नुसती एकटक पाहात बसलेली....) ... आणि तू तरी एरवी इतकं सगळं स्पष्ट बोलतेस त्यांना पण मम्मीचे असे हाल करू नका हे काही ठामपणे सांगत नाहीत ... वैताग आहे नुसता..( क्षणभरानं --) तरी बरं तुला रविवार सुट्टी आणि त्यांना गुरुवार -- नाहीतर आज एकटीला असं घरात कठीण गेलं असतं मला .. बरंय .. तू तरी आहेस...

प्रिया : मम्मी, तू म्हणतेस, पण तूच सांग, मी असं काही सांगितलं तर लगेच अगदी ऐकणार आहेत का ते ? उलट बायका म्हणून पुन्हा एकदा हिणवून चडफडणार ते .... त्यांचं सगळं बरोबरच वाटतं त्यांना -- आता हेच बघ -- त्या पिट्टूचं असणंही महत्त्वाचं -- हरवणंही महत्त्वाचं -- आणि आता -- ते महत्त्वाचं नाही, असं दाखवणंही महत्त्वाचं -- ते म्हणतील तसंच सगळं --

मालती : मी त्यांची बायको असायच्या ऐवजी तो पांढरा पिट्टू असते तर बरं झालं असतं ...

प्रिया : पण मग आत्ता तू हरवलेली असतीस ... कुठल्यातरी बिळात बसलेली .. घाबरून...

मालती : आणि मग नाहीतरी आता काय आहे ? सदोदित हरवलेली आणि बिळात बसलेलीच तर असते मी ... फक्त माझ्यासाठी कुणी जीव टाकत नाही इतकंच ...

प्रिया : पण मम्मी, पप्पा तसे चांगले आहेत ... एक हा काही बाबतींतला त्यांचा स्वभाव सोडला तर ...

मालती : ( नि:श्वासून ) ... बरोबर आहे। ... माझं मन कुणाला तरी कळावं असं वाटतं... पण घरात कुणाकडूनही अपेक्षा करण्यात अर्थ नाही....

प्रिया : पप्पा असंच म्हणतात मम्मी... आता मीच फक्त असं बोलायची राहिलेय हे लक्षात घ्या म्हणजे झालं .. (उठते. ) चला ! असा वेळ घालवून चालायचं नाही ... ( जाते. मालती एकटी बसून...काही क्षण एखादं मासिक वाचायचा प्रयत्न करते...काही क्षणांनी ठेवून देते ...आळोखापिळोखा देते ... मग नुसती बसून राहते ... एवढ्यात फोनची रिंग वाजते. ती फोन घेते.)

मालती : ( फोनवर -- ) हं -- मी मिसेस मोहिले बोलतेय -- हं -- मिस्टर मराठे नं – हं -- बोला -- बरं – हं -- घातला घेराव ?...हं – हं -- नाही नाही -- काळजीचा काही प्रश्न नाही -- हं -- तसं विशेष काही वाटलं तर कळवा ... हं -- बरं -- ( फोन ठेवते. क्षणभरानं -- ) प्रिया ऽ ऽ-- ( जरा मोठ्यानं --) ए ऽ प्रिया ऽऽ -- ( प्रिया घाईनं येते --) घेराव घातलाय । --

प्रिया : ( क्षणभर पाहून --) असूं दे ! ( जाते. )

मालती : ( स्वत:शीच -- ) काळजी वाटली तरी चिडतात -- आणि म्हणून काळजी दाखवू नये तर बेफिकिरी म्हणतात. पण काळजी वाटते हे खरंच आहे. ( फोनचा नंबर फिरवते.) – हं -- मी बोलतेय -- घेराव घातलाय म्हणून कळलं -- काही त्रास नाही ना? -- औषधाच्या गोळ्या पाठवून देऊ का ? -- नको ?-- ( फोन ठेवलेला असतो तिकडचा. ती दोन क्षण नुसताच फोन धरून बसते आणि मग तो ठेवते. स्वस्थ बसून राहते. इथे हळूहळू अंधार होत जातो. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा समोर प्रिया स्वस्थ बसलेली ... मालती अस्वस्थ ... धोंडी त्यांच्याकडे पाहतो आणि बाहेर जातो ...काही क्षणांनी तो घाईने आत येतो ...)

धोंडी : सायबांची गाडी आली ! ( पुन्हा बाहेर जातो. मालतीही अधीरपणे बाहेर जाते. प्रिया तशीच बसलेली. नंतर काही क्षणांनी मोहिले, मराठे, शिंदे, मालती आणि ब्रीफकेससह धोंडी येतात. सगळ्यांना प्रचंड प्रसंगातून आलेल्या मोहिल्यांची काळजी. )

मोहिले : ( मोजे - बूट काढत --) प्रथम त्यांची ताकद आजमावणं आणि माझी सहनशक्तीची ताकद त्यांना दाखवणं एवढंच करायचं आहे. मी हल्ले सुरू करीन तेव्हा त्यांची काय परिस्थिती होते ते पाहू पुढे ! ( मोजे - बूट जागेवर ठेवून धोंडी जातो. )

मराठे : साहेब, मात्र कमाल केलीत तुम्ही ! संपूर्ण आठ तास तुम्ही एखाद्या डोंगरासारखे खुर्चीत बसून होता ! ही तुमची जबरदस्त तयारी बघून त्यांच्यातलेच काहीजण थक्क होऊन गेले ! हे काम अवघड आहे एवढं आज त्यांना नक्कीच कळलं असेल !

शिंदे : उद्याही असंच रिपीट करणार ते !

मराठे : अहो, उद्या तर याहून जास्त दंगा होईल -- वाजवायला भांडी, वाद्यं आणि झांजा आणायला सांगितल्यायत पावसकरनं --

मोहिले : असूं द्या हो -- डोंट वरी ! -- अशा प्रसंगी आय बिकम अ रॉक -- माझ्यावर आपटून त्यांचीच डोकी फुटतील...

मराठे : शेवटी तर काय आरडाओरडा करत होते ! -- आणि बराच वेळ अगदी जवळून ! वेळ संपल्यावर, त्यांची कल्पना असणार की साहेब घाईनं उठून जातील -- पण छ्या ! -- सगळे निघून गेल्यावर, सावकाश, शांतपणे उठून नेहमीच्या चालीनं साहेब बाहेर आले ! लगेच टॉयलेटलासुध्दा गेले नाहीत -- जरा वेळ याच्याशी, त्याच्याशी नेहमीप्रमाणे बोलून मग नंतर सावकाश गेले --

शिंदे उद्या हवं तर एक दिवस गॅप घेणं शक्य आहे. म्हणजे जरा रेस्ट होईल--

मोहिले : मिस्टर शिंदे, तुम्हाला माझ्याबद्दल अजून बरंच समजायंचंय !

शिंदे : नाही, तसं नव्हतं म्हणायचं मला --

मोहिले : तुम्हाला काय म्हणायचंय त्याच्याबद्दल मलाही काहीतरी म्हणायचं असेलच एवढंच सध्या लक्षात ठेवा तुम्ही !

शिंदे : म्हणजे, मी समजलो नाही साहेब --

मोहिले : सगळं काय आत्ताच समजलं पाहिजे काय ! समजेल काळाच्या ओघात !

मराठे : ( अस्वस्थ -- ) जाऊं द्या साहेब -- मुख्य म्हणजे -- ( फोनची रिंग वाजते ते पाहून --) बहुतेक मोठ्या साहेबांचा असणार -- ( मोहिले फोन घेतात. )

मोहिले : ( फोनवर -- ) हॅलो, गुड इव्हिनिंग, मोहिले स्पीकिंग -- हॅलो सर ! नो सर -- नो ट्रबल -- ही फक्त सलामी आहे -- पहिला वार आपण अंगावर घ्यायची माझी पध्दत आहे -- नाही -- सध्या नवीन विचार काही नको -- पोलीसांची मदत नको घ्यायला -- योग्य वेळी योग्य ते ठरवूच आपण -- यस् सर ! थँक्यू फॉर युवर फेथ इन मी सर ! थँक्यू ! गुड नाईट !( फोन ठेवतात. बसून राहतात. शिंदे पूर्णपणे अपसेट झालेले. ते शिंद्यांकडे बघतही नाहीत.) मला वाटतं मराठे, तुम्ही आता गेलात तरी चालेल -- अं -- उद्या बघू आता --

मराठे : यस सर ! ठीक आहे. उद्या सकाळी येतोच मी -- चला शिंदे --

शिंदे : बरंय -- चलतो साहेब !

मोहिले : हं -- आणि मराठे -- ( विचार बदलून --) नाही -- काही नाही -- उद्या बोलू --

मराठे : बरं -- जातो साहेब --

मोहिले : गुड नाईट !

मराठे : गुड नाईट साहेब ! ( मराठे आणि शिंदे जातात. मोहिले नि:श्वास टाकून अत्यंत रिलॅक्सड् बसतात. काही क्षण शांतता. प्रिया नुसती बसलेली. मालती उभी. )

मालती : कॉफी हवीय ? .... की वॉश घेऊन जेवायलाच येणार ? ( मोहिले काही बोलत नाहीत. ) ... कॉफी हवीय ?

मोहिले : फोन करायचं काय कारण होतं ?

मालती : घेराव घातलाय म्हणून कळवलं मराठ्यांनी -- मग राहवेना -- म्हटलं कुणाचा फोन आहे, कुणाला कळणार आहे ? -- तुम्हीच घेतला म्हणून -- दुसऱ्या कुणी घेतला असता तर मी रॉंग नंबरच सांगणार होते --

मोहिले : अशा वेळी तुला माझी काळजी वाटणं, थोडी का होईना भीती वाटणं -- यात माझा अपमान आहे असा काही विचार आला का डोक्यात ?

मालती : नाही, भीती वाटली नव्हतीच मला -- फक्त औषधाच्या गोळ्या पाठवू का एवढंच विचारायचं होतं --

मोहिले : तेच ! या त्रासानं पुन्हा मला ब्लडप्रेशरचा अॅटॅक येईल अशी तुला भीती वाटली ! -- आणि अशा वेळी आजारपणाची आठवण करून द्यावी की न द्यावी -- असं काही सुचलं नाही तुला ! -- आतून पोखरत राह्यचं सगळं !

मालती : चुकलं असेल !

मोहिले : ( संतापून -- ) चुकलं असेल ?!! -- म्हणजे त्याचीही काही लाज नाही ! -- माझा नायनाट करायचाय तुला ! -- सतत अपमान होतोय माझा -- लाज वाटली पाहिजे माझी बायको म्हणवून घ्यायला ! -- तुम्ही दोघीही मला खलास करणार आहात ! --

प्रिया : मी काय केलं पप्पा ?

मोहिले : तेच ! आपलं सगळं बरोबर आहे असं वाटतंय प्रत्येकाला ! कॉलेजातला तुझा तो मित्र कोण आहे ?

प्रिया : मित्र असा खास कुणीच नाही पप्पा !

मोहिले : मला आता नावही माहीत आहे त्याचं -- तो रामचंद्र चव्हाण हा माझ्या एका शत्रूचा मित्र आहे -- हे माहीत आहे का तुला ? -- अपमान ! अपमान आहे सगळा !

प्रिया : हे मला माहीत नव्हतं पप्पा ! उद्यापासून फार तर मी बोलणार नाही त्याच्याशी !

मोहिले : ( चिडून -- ) मी सांगतोय म्हणून ? म्हणजे घरातही माझी दडपशाही आहे असं चित्र तयार करा ! स्वत:च्या अक्कलेनं काही वागू नका ! अं ! !

मालती : जाऊं दे -- आम्ही नीट वागू यापुढे -- उगीच रागावून त्रास करून घेऊ नका !

मोहिले : मूर्ख आहेस तू ! ( संतापून -- ) मला – त्रास – होत -- नाहीये !!!( शांतता... ) माझ्या काय अपेक्षा आहेत तुमच्याकडून आणि वागताय काय तुम्ही ! ( प्रिया जाऊ लागते --) आणि प्रिया, पुन्हा असलं सांगायची पाळी आणू नकोस -- कळलं ?

प्रिया : नाही पप्पा -- मी यापुढं काळजी घेईन --

मोहिले : काळजी घ्यायची नाहीये ! आपोआप बरोबरच झालं पाहिजे सगळं ! -- कळलं !!

प्रिया : ठीक आहे पप्पा --

मोहिले : ' ठीक आहे पप्पा ' -- असं नमतं घेतल्यासारखं आणि मला सांभाळून घेत असल्यासारखं बोलू नकोस – समजून वागा म्हणजे झालं !

मालती : अहो, मग काय म्हणायला पाहिजे तिनं ? उगीच का चिडताय असे !

प्रिया : राहू दे मम्मी ! एकमेकांच्या आयुष्यांचे भाग आहोतच आपण -- त्यामुळं कुणी कसं वागायला हवं हे असणारच काही ना काही प्रत्येकाचं ! -- बास झालं ! ( जाते. )

मोहिले : तुम्ही दोघीही नुसती काळजी घेताय माझी ! अरे काळजी नकोय मला -- प्रेम हवंय प्रेम ! बाहेर कशाचं काही वाटत नाही, पण घरात आलं की डोकं फिरवताय तुम्ही माझं ! आयुष्याचा चुथडा करून टाकताय अगदी --

मालती : मी काही बोलतच नाही आता --

मोहिले : ( जवळजवळ ओरडत --) अरे, मला काय वेड लागलंय असं समजता का काय तुम्ही ? डोकं फिरलंय माझं ? अं ? बोलतच नाही म्हणजे काय ? काय फरक पडतोय ? न बोलणं हा एक वागण्याचा प्रकार नाही होत ? का अदृश्य होणार आहेस तू ? अं ? काय चाललंय काय हे ?! ( मालती आत जाते --) निघून गेल्यानं मूर्खपणा लपणार आहे का काय ! अं ! वैताग आहे नुसता -- ( थरथरत राहतात ...)

मालती : ( जरा वेळानं आतून बाहेर येते आणि भीती लपवून प्रेमानं बोलायचा प्रयत्न करते -- मऊ आवाजात --) जेवायला चलताय ?

मोहिले : ( मानेला झटका देऊन, संतापून तिच्याकडे पाहून, मोठ्या आवाजात --) जेवायचं – नाहीय - मला !!! (मालती जाते. मोहिले सोफ्यावरच आडवे पडतात ...संतप्त अवस्था... काही क्षणांनी जणू स्वत:शीच बडबडत --) मोरे, आलेगावकर, पाटील, फडके आणि सुंदरन् -- तुम्ही पहिलं लक्ष्य असाल माझं – तुमचं हसणं, कुत्सितपणा, माझी टर उडवणं -- पस्तावाल तुम्ही ! -- भोसडीच्यांनो, सारख्या चुका काढल्या जातील आता तुमच्या -- जगणं हराम करीन मी आता तुमचं ... तुमची कुटुंबंसुध्दा घाबरतील असं होईल... माझ्यासमोर !?....माझ्या ? ....( क्षणभरानं मालती येते. पाहते. पुन्हा आत जाऊन एक शाल घेऊन येते आणि त्यांना पांघरूण टाकते. काही क्षण पाहून आत जाते. मोहिले पडलेले. थोडा

काळ गेलेला सुचवावे. ते संतापानं तळमळताहेत. मालती येते. केस थोडे विस्कटलेले. तिलाही झोप नाहीय आणि ती लक्ष ठेवायला आलीय हे उघड आहे. मोहिले घोगऱ्या आवाजात नुसतेच ‘ हा ऽ हं ऽ ‘ असे करताहेत. ती विचारात पडते. प्रिया किंवा धोंडी यांना बोलवावं का म्हणून त्या दिशेनं पाहते पण मग सरळ फोन लावते.)

मालती : ( फोनवर -- ) कोण, डॉक्टर का ? हं -- मी मिसेस मालती मोहिले बोलतेय -- हं -- यांना जरा बरं नाहीय -- मागच्यासारखं बीपीचं असेलसं वाटतंय -- तुम्ही जरा लौकर घरी या -- हं, प्लीज -- तुम्ही आलात की बाकीचं सांगेन मी -- हं -- जरा पहाटेच त्रास देतेय -- पण -- हं, ठीक आहे –
( फोन ठेवते. )

मोहिले : ( जणू भ्रमातच --) -- बरोबर आहे तुझं -- बोलाव डॉक्टरना -- बोलाव -- काल गोळ्या घ्यायला हव्या होत्या -- बरोबर आहे...( ती जवळ बसते. काही क्षण पाहते आणि मग सावकाशपणे त्यांच्या केसांतून हात फिरवत राहते किंवा त्यांचा हात हातात घेऊन बसून राहते ... अंधार होत जातो .. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा दुसऱ्या दिवसाची संध्याकाळ... .प्रिया समोर वाचत बसलेली. काही क्षण जातात.. मग धोंडी येतो ...)

प्रिया : धोंडी ऽ

धोंडी : जी ताई --

प्रिया : मम्मी काय करतेय ?

धोंडी : आत आहेत --

प्रिया : मी आलेय ते माहीत आहे का तिला -- किती वेळ झाला --

धोंडी : सांगतो जी --

प्रिया : काय करत होती दिवसभर ?

धोंडी : काय सांगू --

प्रिया : मी बोलावतेय म्हणावं बाहेर -- शिवाय थोड्या वेळात तेही सगळे येतील --

धोंडी : व्हय जी -- (तो आत जातो. काही क्षणांनी मालती सावकाशपणाने येते. बसते.जणू गळाठलेली --रडवेली. )

प्रिया : मम्मी तू अशी हातपाय गाळून रडत बसलीस तर पप्पांना काय वाटेल ? अं ? ए, मम्मी --

मालती : किती हाल करून घेतात स्वत:चे -- त्यात माझा आणखी त्रास..( हुंदका देते. )

प्रिया : अग पण मम्मी --

मालती : पण खोटं नाही वागता येत ... मी दुसरी -- त्यांना हवी तशी होऊच शकत नाही... कितीही प्रयत्न केला तरी मी आहे तीच राहतेय ...

प्रिया : असं कसं अगं मम्मी -- बरं, काय काय झालं दिवसभर ? तू तरी त्रास करून नको घेऊस --

मालती : इतके आजारी होते -- डॉक्टर तर म्हणत होते की एक आठवडा विश्रांती घ्यायला हवीय -- पण त्यांनी दिलेल्या इंजेक्शन-औषधांनी बरं वाटलं म्हणाले -- सध्या विश्रांती शक्यच नाही म्हणे -- बरं, मीही नका जाऊ असं म्हणायची सोय नाही -- आता तूच सांग, तो पिट्टू हरवलेलं आणि ते घेराव घातलेलं डॉक्टरांना सांगायला हवं होतंच की नाही -- नाहीतर त्यांना कसं कळलं असतं की हे अचानक असं का झालं ते -- तर डॉक्टरांच्या बोलण्यामुळं, मी त्यांना ते सांगितल्याचं, यांना कळलं ! डॉक्टर गेल्यावर त्याच्यावरूनही चिडले ---

प्रिया : स्वभाव आहे तो त्यांचा ... आणि त्यांना काही व्हायचंही नाही... बघ तू मम्मी ... मनाची शक्ती फार आहे त्यांच्याकडे ...( मालती काही बोलत नाही --) आपली मनं अशी अशक्त ठेवून चालणार नाही मम्मी ...

मालती : काल तर जेवलेच नाहीत... आजही जेवणावर लक्ष नव्हतंच त्यांचं ... माझ्यामुळंच असं वागतायत ते ... काय होणार आहे, काही कळत नाही... मराठे सांगत होते फोनवर की आज तर फारच दंगा होता म्हणे... आरती म्हटली म्हणे यांच्या नावाची टर उडवत... आणि त्यांना कसं कळलं कोण जाणे -- साहेब घाबरले -- पहाटे डॉक्टर आणला -- असंही ओरडले म्हणे ते !-- किती रानटी असतात गं हे लोक !--

प्रिया : पप्पांच्याबद्दल त्यांनाही असंच वाटत असेल मम्मी ! ... ( मालती हुंदके देऊ लागते...) मम्मी, ए मम्मी, काय हे ! ... ( तिच्या खांद्यावर हात ठेवते. )

मालती : ...अशा वेळी माझा उपयोग व्हायच्या ऐवजी त्रासच होतोय त्यांना ...

प्रिया : पण डॉक्टरना तूच बोलावलंस ना -- ( धोंडी आतून लगबगीने येतो -- )

धोंडी : ( बाहेर जाताजाता -- ) सायेब आले ! -- ( जातो. काही क्षणांनी मोहिले, मराठे आणि शिंदे येतात. धोंडी ब्रीफकेस घेऊन येतो, ठेवतो. मालती चेहरा पुसत आत जाते, काही क्षणांनी परत बाहेर येते. मोहिले बूट- मोजे काढतात. धोंडी ते उचलून जागेवर ठेवतो आणि जातो. वातावरण गंभीर. मोहिल्यांचं आजारपण आणि थकवा लपू शकत नाहीत --)

मोहिले : हं, बसा --

मराठे : एवढा चिवटपणा आम्ही जन्मात बधितला नव्हता साहेब. दोन दिवस सतत आठ-आठ तास म्हणजे कमाल झाली.

शिंदे : तेही दुसऱ्या दिवशी तर आजारी असून --

मोहिले : आजारपणाचं काही नाही म्हणा !

मराठे : काय बॅलन्स ठेवला होता साहेबांनी ! त्यांना जास्त प्रोव्होक तर करायचं नाही आणि आपला शांतपणा

आणि खंबीरपणाही सोडायचा नाही !

मोहिले : अंदाज घेताना हीच पध्दत महत्त्वाची असते -- त्यामुळे प्रतिपक्ष खचल्यासारखा होतो -- आणि दोन वार असे अंगावर घेतल्यावर नंतर आपल्यालाही चांगला चेव येतो --

मराठे : घोषणांचा आवाज इतक्यांदा ऐकणं -- टेरिफिक ! ते तीनशे आणि साहेब एकटे ! --

मोहिले : दॅट इज द पार्ट ऑफ द गेम --

मराठे : त्यांनी साहेब तुमचा इतका छळ करायचा प्रयत्न केलेला आहे की तुम्ही यापुढे आता काहीही केलंत तरी चूक होणार नाही --

मोहिले : कुरेशीसाहेब येताहेत आत्ता एवढ्यात -- त्यांच्या विचारानं पुढची ॲक्शन ठरवायची ...

शिंदे : मग -- बरं, मी जाऊ साहेब ?

मोहिले : हं --

मराठे : मीही जातो साहेब -- कुरेशीसाहेबांचा तसा दराराच वाटतो -- तुमच्याबद्दल कसं जवळीकीनं एक प्रेमाचा विश्वास तयार झालेला आहे ... ( बाहेर कारचा आवाज आणि हॉर्न ...) आलेच वाटतं ! चला ! बरंय साहेब !

मोहिले : हं -- बरंय -- ( शिंदे, मराठे जातात. कुरेशी येतात. ) या ! या साहेब -- तुमचीच वाट बघत होतो --

कुरेशी : नमस्कार मिसेस मोहिले, हॅलो प्रिया-- ( त्यांचा प्रतिसाद. मग प्रिया जाते. ) -- दोन दिवस चांगलीच टक्कर दिलीत तुम्ही ! -- अशी टक्कर आमच्या पुढाऱ्यांनी पूर्वी कधीच अनुभवलेली नाही -- सुपर्ब !

मोहिले : आपल्या युनियनच्या ताकदीवर आपण कुणालाही कसंही वाकवू शकतो हा भ्रम काढून टाकला पाहिजे साहेब त्यांचा --

कुरेशी : बरं, सुरुवातीला तुम्हाला वातावरण चिघळवून जे टेन्शन तयार करायचं होतं ते काम झालेलं आहे. आता आपण हे इथं थांबवू. तुम्हाला प्रोटेक्ट करणं हे आमचं काम आहे. तर मला असं वाटतं की आपण काही किरकोळ मागण्या मान्य करून टाकू आणि इतर मागण्यांच्या बाबतीत बोलणी करायचं आश्वासन देऊ. तुम्ही आहे तसं टफ राहयचं -- मी येऊन हे जाहीर करीन -- आणि पुढे मग यू मे हॅव युवर वेज -- आम्ही तुमच्या पध्दतीत ढवळाढवळ करणार नाही --

मोहिले : ठीक आहे साहेब -- अगदी योग्य आहे -- ( इथं मालती उठून आत जाऊ लागते -- )

कुरेशी : मिसेस मोहिले, आता काही करू नका, प्लीज-- मी जरा गडबडीत आहे -- आय मस्ट गो -- फक्त या बाबतीत काय ते ठरवावं म्हणून आलो होतो --

मोहिले : बरोबर आहे साहेब -- आणि उद्या तुम्ही स्वत: येणं महत्त्वाचं आहे -- म्हणजे माझ्याही वागणुकीला एक संगती राहील -- हा एक छोटासा विजय होईल त्यांचा पण जे काय झालं त्याच्या रागावर आधारित असं मलाही वागता येईल.

कुरेशी : यू आर क्वाईट रीझनेबल -- मला वाटलं होतं की हे तुम्हाला पटवून द्यावं लागेल --

मोहिले : एखादी लढाई बिनमहत्त्वाची आहे साहेब -- आपल्याला युध्द जिंकायचं आहे -- आणि माझा एक साधा विचार सांगतो -- आपण या लोकांच्या रिलेशन्समधे ढवळाढवळ करत नाही तोपर्यंतच हे एक असतात. काहींच्यावर सवलतींची आणि कृपेची बरसात आणि काहींच्यावर सतत नुसता अन्याय, त्रास, अडचणी -- असं सुरू केलं की यांच्यात फूट पडायला वेळ लागत नाही -- फक्त सहा महिन्यांच्या आत यांच्यात मारामाऱ्या लावून दाखवतो मी तुम्हाला -- आफ्टर सिक्स मन्थस् युनियन विल नॉट बी अ प्रॉब्लेम...फार कडवे नसलेल्यांना सध्या हात लावायचा नाही ... सध्याच्या लीडरशिपवर नाराज असलेल्यांना प्रोत्साहन द्यायचं -- त्यांच्या सांगण्या-बोलण्याचं महत्त्व वाढवायचं -- त्यांच्या मागं लोक वाढतील असं पाह्यचं -- आणि जे आपल्या कडवेपणाचं प्रदर्शन करतात, त्याचं भूषण मानतात त्यांचं जगणं मुश्किल करत राह्यचं -- बघा तुम्ही -- हा डोलारा तसा टिकावू नसतो ..

मालती : कॉफी आणू का पटकन् --

कुरेशी : नको नको -- सॉरी -- बरंय मिस्टर मोहिले -- ठरलं मग -- टेक रेस्ट !--

मोहिले : यस् सर ! ( कुरेशी निघतात -- )

कुरेशी बरंय मिसेस मोहिले -- गुड नाईट -- बोथ ऑफ यू ! टेक रेस्ट नाऊ !

मोहिले : थँक्यू सर ! गुड नाईट !

कुरेशी : तुमचा तो उंदीर नाहीच सापडला नं शेवटी !

मोहिले : नाही साहेब -- पण काही विशेष नाही --

कुरेशी : अच्छा -- गुड नाईट ! ( कुरेशी जातात. )

मोहिले : ( स्वगत -- ) तुझं नाहीसं होणं हे मला असं झटकावं लागतंय पिट्टू ... झटकावं लागतंय .... ! हा कमरेखालचा वार केलेला आहे त्यांनी ... काहीही करून कुठूनही मी तुला सोडवून आणलं असतं पिट्टू .. पण तू कुठं आहेस ते तरी कळायला हवं ना .. ( शांतता. मोहिल्यांची पिट्टूविषयक जी स्वगते आहेत त्यावेळी एकच पार्श्वसंगीत वापरावे. ते पार्श्वसंगीत म्हणजे पिट्टूबद्दल विचार असे पक्के करावे. हे पार्श्वसंगीत चालू असतानाच अंधार होत जातो ... पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा चारपाच दिवसांनंतरचे दृश्य ... एक पारंपरिक सकाळ होते आहे. पारंपरिक ऊन पडत जाणे .. पारंपरिक सनई वगैरे. .. पारंपरिक धोंडी पारंपरिक साफसूफ करतो आहे ... असे जरा वेळ झाल्यावर फोनची रिंग वाजते.. धोंडी सावकाश येऊन फोन घेतो ...)

धोंडी : ( फोनवर-- ) हॅलो -- हां-- मोहिलेसायेब -- हां -- आहेत -- हॅलो, कोण बोलतंय -- आं ? -- इन्स्पेक्टरसाहेब ? -- हां हां -- बोलवतो -- ( रिसिव्हर खाली ठेवून क्षणभर विचारात उभा राहतो -- ) पोलीस स्टेशनचा फोन ? ( काही कळत नाही असा चेहरा करून हात हलवतो आणि आत जातो

.....काही क्षणांनी मोहिले येतात -- ते आता आंघोळ वगैरे होऊन जरा ताजेतवाने दिसताहेत -- पण चालीत आजाराची झाक आहेच -- मागोमाग धोंडी येऊन उभा राहतो... मोहिले फोन घेतात ...)

मोहिले : ( फोनवर -- ) हॅलो, गुड मॉर्निंग ! हं -- हं -- बोला इन्स्पेक्टरसाहेब --माझ्याकडे ?-- माझ्याकडे कसलं काम काढलंयत ?-- येताय तुम्ही ? -- हं, या या ! -- नाही -- आहे, मी घरीच आहे -- एक तासदीड तास तरी मी आहे घरी -- पंधरा मिनिटांत येताय ना, मग प्रश्नच नाही -- या तुम्ही ! हं ! -- ( फोन ठेवतात. काही क्षण विचारात उभे ... नंतर धोंडीकडे लक्ष जाते. जरा त्रासिकपणा -- ) धोंडी तू फक्त काम करायचंस -- काही ऐकायचं नाहीस आणि पाह्यचं नाहीस !--

धोंडी : जी -- ( जायला लागतो -- )

मोहिले : थांब -- ( थांबतो. ) पुन्हा हे सांगायची पाळी आणू नकोस --

धोंडी : जी -- ( जातो. प्रिया नुक्ती झोपून उठलेली. एका खोलीतून येते. आळोखेपिळोखे देते. क्षणभर मोहिल्यांकडे पाहते आणि आत जाते. नंतर मोहिले प्लेयर ऑन करतात. ' मुंगी उडाली आकाशी...' चालू आहे ...येऊन स्वस्थ बसतात...मग जवळच असलेले वर्तमानपत्र घेऊन वाचत राहतात... मालती घाईघाईनं आतून बाहेर येते ... मग एकदम ब्रेक लावून सावकाश पुढे येते ...)

मालती : चहा आणू ?

मोहिले : पोलीस स्टेशनवरून फोन होता -- इन्स्पेक्टर वाघमारे येताहेत -- एक पाच मिनिटांनी आण --

मालती : पोलीस स्टेशन ?

मोहिले : आता मलाही माहीत नाही. बघू. जा.

( मालती आत जाते. ' मुंगी उडाली ... ' संपल्यावर ' गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला ' सुरू होते. मोहिले उठून ते बंद करतात. पुन्हा येऊन वर्तमानपत्र वाचत बसतात... दारात इन्स्पेक्टर वाघमारे येतात -- बेल वाजवतात-- मोहिले उठतात -- ) हं, या,

या !-- बसा !

वाघमारे : तुम्हाला सकाळीच जरा त्रास देतोय -- ( बसतात.)

मोहिले : काही नाही. बोला.

वाघमारे : चारपाच दिवसांपूर्वी तुम्हाला घेराव वगैरे झाला होता असं कळलं. आमची मदत घेता आली असती तुम्हाला --

मोहिले : आमच्या बाजूनं त्यांना चिडायला निमित्त द्यायचं नव्हतं -- आणि याला तोंड द्यायची आमची एक पॉलिसी ठरलेली होती -- पण लागेल तेव्हा मदत घेणारच तुमची -- बोला.

वाघमारे : म्हटलं तर तशी गंभीर गोष्ट आहे -- पण तसं विशेष काही नाही -- माझ्या परीनं होईल ती सर्व मदत करीन मी --

मोहिले : बोला -- काय, तक्रार बिक्रार ?

वाघमारे : नाही -- तक्रार वगैरे काही नाही -- पण म्हणजे काल रात्री साडेनऊच्या सुमाराला एका कॉलेज विद्यार्थ्यानं आत्महत्या केली आहे -- त्या तपासात असताना काही धागे इकडे येतायत म्हणून आलो होतो --

मोहिले : कोण विद्यार्थी ?

वाघमारे : रामचंद्र चव्हाण म्हणून आहे -- तुमच्या मुलीची आणि त्याची मैत्री होती असं दिसतंय -- ( मोहिले आता तल्लखपणे ऐकताहेत -- ) त्याच्या काही डायऱ्या आणि वह्या पाहिल्या -- त्यात तिचे उल्लेख आहेत --

मोहिले : बरं --

वाघमारे : तो आत्महत्येला कसा काय प्रवृत्त झाला हे जरा बघत होतो -- प्रेमप्रकरण वगैरे काही नसणार असंच वाटतं मला -- पण तपास तर करायला पाहिजे ना हो --

मोहिले : म्हणजे काय, उल्लेख तरी काय आहेत ?

वाघमारे : एक कवितांची वही आहे. त्यातल्या काही कविता तुमच्या मुलीबद्दल आहेत असं त्याच्या डायरीत लिहिलेलं आहे --

मोहिले : म्हणजे ? उगीच सुतावरनं स्वर्ग नको --

वाघमारे : तसं हे एकच कारण असेल असं काही दिसत नाही – गरिबी, वडिलांचं आजारपण, बहीण एका परधर्मीयाबरोबर पळून गेलेली, वगैरे अनेक कारणं दिसतात. अचानक तुमच्या मुलीत आणि याच्यात काही दुरावा तयार झाला असं दिसतंय -- शेवटच्या काही पानांत लिहिलंय त्यानं तसं -- तर हे सगळं मिळून येऊन, त्रासून त्यानं आत्महत्या केली असं दिसतंय -- मुलगा अतिशय हुशार आणि अतिशय समजुतदार होता असं म्हणतात -- अर्थात आत्महत्या बहुतेक असलेच लोक करतात म्हणा !

मोहिले : कविता कसल्या आहेत ?

वाघमारे : कविता कसल्या साहेब -- डोकं उठून गेलं ! -- कॉलेज सोडल्यावर कविता वाचल्या त्या याच ! एरवी कोण कविता वाचायला बसलंय ! -- असलं मऊ, नाजूक मनानं आम्ही कविता वाचत बसलो तर साधा खिसेकापूसुध्दा आम्हाला किंमत देणार नाही ! --

मोहिले : होय -- पण काय आहे तरी काय त्यात ?

वाघमारे : तसं सांगणं कठीण आहे साहेब -- म्हणजे तुम्हालाही ते बाड वाचल्यावर तसंच वाटेल -- म्हणजे मला असं वाटतं --

मोहिले : तरी पण ? ( वाघमारे खिशातून एक कागद काढतात आणि तो पाहात बोलतात. )

वाघमारे : काय साहेब, ' तुझ्या डोळ्यांची संध्याकाळ ' म्हणे ! म्हणजे तिच्या भुवयांचे खंजीर याच्या हृदयात

घुसून त्यातून उसळलेल्या उष्ण रक्तानं संध्याकाळ लाल झाली ! -- आणि अंधाराची वाट पाहात हा क्षितिजव्याप्त रक्ताळलेला बसून -- असलं काहीतरी आहे..! सगळे नॉन कॉग्निझेबल ऑफेन्सचे प्रकार !...

मोहिले हं --

वाघमारे : आणि हा -- म्हणजे माफ करा हं साहेब ...बरं का, तिच्या केसांच्या अंधारात हा पडून राहिलेला असताना अधिकाधिक तापत गेला तिचा अनभिषिक्त स्पर्शसूर्य आणि याच्या अस्तित्वाच्या कणाकणात पसरलं बेभान इंद्रधनुष्य ! -- असं काही होऊ शकेल ?

मोहिले : हं ?

वाघमारे : ‘ तुझ्या ओठांचे गगनचुंबी लावण्य ‘ -- म्हणजे माफ करा हं साहेब -- त्याच कवितेतलंच आहे हे -- ( मालती चहा घेऊन येते -- ) नमस्कार बाई !

मालती : नमस्कार ! ( ट्रे ठेवून जाते. मोहिले चहा देतात - घेतात. )

वाघमारे : अजून एक, बरं का --

मोहिले : नको आता -- कळलं !

वाघमारे : म्हणजे हे असलं सगळं -- म्हटलं कितपत काय होतं त्याची जरा चौकशी करावी -- फारसं काही नसणारच -- कवी लोकांचं काय एवढं मनावर घ्यायचंय -- पण एक आपलं कामाचा भाग --

मोहिले : ठीक आहे. आता मी तुम्हाला सांगतो. धिज इज ऑल ट्रॅश ! कचरा आहे ! काही तथ्य नाही त्यात. प्रेमबीम काही नव्हतं. आता माधुरी दीक्षितवर हजारो कवी कविता लिहितात -- त्याला ती काय करणार -- याची बातमीबितमी द्याल कुठं तेव्हा उगीचच या नाही त्या किरकोळ गोष्टीला महत्त्व देऊ नका --

वाघमारे : प्रश्नच नाही साहेब ! तुमचे आशीर्वाद मात्र राहू द्यात म्हणजे झालं ! आम्ही तुम्हाला कशाला उगीच अडचणीत आणू ! ती काळजीच करू नका तुम्ही ! पण एकमेकांना नीट कल्पना असावी --

मोहिले : नाही, तुम्ही एवढं अगत्यानं आलात आणि एवढं आपुलकीनं यात लक्ष घातलंत हे चांगलंच आहे – आम्ही तरी काय हे काय विसरून जाणार आहे का -- तो प्रश्न नाही -- आता माझंच बघा ना, माझा एक अत्यंत आवडता उंदीर --

वाघमारे : उंदीर ?

मोहिले : हं -- एक पांढरा उंदीर होता -- पिट्टू नावाचा -- मी पाळलेला -- तर तो कुणीतरी दुष्ट हेतूनं पळवलाय असा आम्हाला संशय आहे -- आता या गोष्टी -- म्हणजे आमच्या दृष्टीनं कितीही महत्त्वाच्या असल्या तरी -- त्या आम्ही तुमच्या पर्यंत आणायच्या का ?

वाघमारे : नाही, म्हणजे मला कल्पनाच नाही की अशी काही घटना इथं घडलीय म्हणून ! कुणावर संशय आहे का तुमचा ? साधारण किंमत काय होती त्या उंदराची ?

मोहिले : लाख मोलाचा जीव होता तो वाघमारे -- ते जाऊ द्या -- तर हे मिटवून टाका -- उगीच आपलं कुणीतरी काहीतरी डोक्यात घ्यावं आणि कुठंतरी तिसऱ्यालाच त्याचा त्रास व्हावा, हे असलं नको ! आणि तुमच्या कर्तव्याच्या बाबतीत सुध्दा हा एक धर्म आहे --

वाघमारे : तर ! प्रश्नच नाही ! बरं, साहेब, मुलगी आहे का तुमची घरात ?

मोहिले : आहे -- कशाला ? मी सांगितलं ना तुम्हाला ! तिला कशाला डोक्याला खुराक ! -- मी विचारून घेतो तिला -- नंतर भेटेन मी तुम्हाला -- अं --

वाघमारे : काही नाही -- एक आपलं सहज उत्सुकता म्हणून विचारलं --

मोहिले : नाही, उत्सुकता ठीक आहे -- पण ठीक आहे -- तुम्ही काळजी करू नका -- भेटूच आपण -- आणि आपल्याकडं कंपनीतही जरा गोंधळ चालू आहे -- कामं निघणार आहेतच --

वाघमारे : आभारी आहे साहेब -- मला वाटलंच होतं की हे असलं काहीतरी बिनबुडाचं असणार -- एका घरंदाज मुलीचा प्रश्न आहे -- आम्हालाही विचार करावा लागतोच --

मोहिले : प्रश्नच नाहीय तर विचार कसला करताय ?

वाघमारे : होय होय -- तुम्हीही हा विचार काढून टाका मनातून -- पण तुम्हाला कल्पना देणं तर माझं काम होतं --

मोहिले : आभारी आहे.

वाघमारे : बरं, जातो साहेब !

मोहिले : हं -- भेटू -- तेवढं बघा पण --

वाघमारे होय साहेब -- अच्छा ! -- जातो साहेब !

मोहिले : हं -- ठीक आहे. ( वाघमारे जातात. ते जात असतानाच मराठे घाईघाईनं आत येतात. मोहिले शांतपणे त्यांच्याकडे पाहतात. वाघमारे गेल्यावर --) बसा मराठे -- ( आत जाऊ लागतात --)

मराठे : ( अत्यंत अधीर आणि अस्वस्थ --) साहेब, साहेब --

मोहिले : बसा मराठे, आलोच ! ( आत जातात. मराठे भयानक अस्वस्थ. अत्यंत अस्थिर हालचाली. काय करावे ते त्यांना सुचत नाही. केव्हा एकदा साहेब बाहेर येतायत अशी अवस्था. पेपर उचल, ठेव -- बस, ऊठ -- येरझाऱ्या -- पुन्हा साहेब आले का ते बघणे -- असे दिङ्मूढपणे करत राहतात... असा काही वेळ गेल्यावर मोहिले येतात.)

मोहिले : बसा, मराठे, बसा !

मराठे : ( अत्यंत अधीरपणे बसत --) साहेब, एक भयानक बातमी आहे --

मोहिले : तुमच्या समोरच तो इन्स्पेक्टर गेलेला बघितलात ना ? -- दुसरी कसली आहे बातमी ?

मराठे : दुसरी -- म्हणजे -- म्हणजे तो रामचंद्र चव्हाण --

मोहिले : ते झालं ! तेवढंच ना ! तुम्ही घाबरताय का एवढे !

मराठे : नाही साहेब, मी तुम्हाला बोललो होतो त्याच्याबद्दल एकदा -- म्हटलं आता -- म्हणजे --

मोहिले : तुम्ही योग्य तेच केलं होतंत मराठे -- तुम्ही का उगीचच अस्वस्थ होताय असे ?

मराठे : म्हणजे साहेब -- मला वाटलं --

मोहिले : तसं काहीही नाहीय --

मराठे : वायंगणकर भेटला होता -- रामचंद्र चव्हाणनं आत्महत्या केलीय -- एवढंच साहेबांना सांगा, म्हणाला -- ( मोहिले अस्वस्थ --) पण साहेब --

मोहिले : तेच सगळं बोलणं झालं आत्ता -- त्या पोरानं मरायच्या आधी काही कविताबिविता आणि डायरीबियरी लिहिलीय वाटतं -- त्यात कुठंतरी प्रियाचा उल्लेख आलाय -- फालतू काहीतरी -- असो -- मिटलं ते लगेच -- काळजीचं कारण नाही --

मराठे : तिला -- म्हणजे प्रियाला कळलं ?

मोहिले : सांगायचं आता मराठे -- अं -- सांगू --

मराठे : हं ... मी म्हणजे ऐकल्यावर घाबरूनच गेलो ... म्हटलं काय आहे न् काय नाही ... प्रेमबीम असतं समजा त्यांचं तर म्हणजे केवढ्याला पडलं असतं हे -- बापरे --

मोहिले : तसं काही नाहीय मराठे -- काळजी करू नका तुम्ही – अं -- जा तुम्ही --

मराठे : जाऊ ? ( उठतात -- पण अजून बरेच काही बोलायचे असल्यासारखा चेहरा --)

मोहिले : हं -- जा तुम्ही --

मराठे : ( अज्ञ बालकाप्रमाणे --) बरं -- जातो साहेब --

मोहिले : हं -- ( मराठे दिशाहीन जातात. काही क्षण शांतता. नंतर सावकाशपणे मालती बाहेर येते. काळजीयुक्त चेहरा ...) तर मुळात काळजीचं वातावरण नकोय -- प्रियाला मी आत्ता सांगणार आहेच सगळं -- काहीही होणार नाही -- विशेष काही नसणारच त्यात -- पण तू उगीच गंभीर चेहऱ्यानं वावरू नकोस आणि फारसं काही बोलू नकोस – जे कळेल तेवढ्यावर शांत राहा – चौकशा नकोत -- हे नीट हँडल करावं लागेल -- तू नंतरसुध्दा तिच्याशी बोलताना हा विषय कधीही काढायचा नाही – विषय म्हणजे हा तुला जो जेवढा कळेल तो -- मी नीट बघतो सगळं --

मालती : ते इन्स्पेक्टर काय म्हणत होते ? मला तर काहीच कळत नाहीय – प्रियाचं काय ?

मोहिले : तसं काहीही नाहीय -- . तू लक्षच घालू नकोस याच्यात -- बाहेर काही होणार नाही पण प्रियाला जरा नीट सांगितलं पाहिजे -- ते मी बघतो -- तुझ्या वागण्यातसुध्दा हे काही येता कामा नये -- कळलं ?

मालती : तिला एकदम धक्का बसण्यासारखं काही नाही ना ?-- उगीच नाहीतर --

मोहिले : तू काळजी करू नकोस म्हटलं ना -- जा आता -- आणि प्रियाला -- ( शिंदे येतात -- त्यांना पाहून

मालतीला --) ठीक आहे मी नंतर बोलावीन -- ( शिंदेना --) हं -- या शिंदे -- ( मालती क्षणभर उभी राहते आणि मग आत जाते. )

शिंदे : ( काही क्षणांनंतर --) साहेब, एक काम होतं --

मोहिले : शिंदे, सध्या मी जरा वेगळ्या विचारात आहे -- ( तुटकपणा -- ) नंतर बोलू --

शिंदे : तुमच्यासाठीच आलो होतो -- जातो हवं तर --

मोहिले : बरं, बोला चटकन् --

शिंदे : रामचंद्र चव्हाण नावाच्या एका कॉलेज विद्यार्थ्याच्या आत्महत्येबद्दल काही कळलंय तुम्हाला ?

मोहिले : त्याचं काय ?

शिंदे : सध्या ही गोष्ट अजून वायंगणकर -- पावसकर यांच्यामधेच आहे --

मोहिले : बरं मग ?

शिंदे : आपली ऑफिशियल रिलेशन्स काहीही कशीही असली तरी मी काही बरं करायचा प्रयत्न केलाय -- जो मराठ्यांना दहा जन्मात जमणार नाही --

मोहिले : हं -- बोला --

शिंदे : तुम्हाला थोडंफार माहीत आहे असं गृहीत धरून बोलतो -- तुम्ही जर त्यांच्याशी फार व्देषानं किंवा सूडानं वगैरे वागलात तर या आत्महत्येचा ते दुरुपयोग करतील असं दिसतं -- कुठंतरी उल्लेख आले म्हणून लगेच कुणी जबाबदार होत नाही -- पण मनस्तापाचं होऊ शकतं ते -- विशेषत: तुमच्या मुलीला -- नुसता हा चर्चेचा विषय केला तरी --

मोहिले : -- हं --

शिंदे : ही चर्चा हवेत कुणी सोडली हे कळणारही नाही -- ( क्षणभरानं --) ते माझ्याशी बोलले या विषयावर – मी त्यांना म्हटलं, असं होऊ देऊ नका -- अमानुषपणाचं होईल ते -- तर त्यांचा प्रश्न असा की त्यांच्या कुटुंबियांवर अमानुष परिणाम होतील असं वागतांना तुम्ही विचार कराल का ?

मोहिले : -- हं ऽ ऽ ...( नि:श्वास टाकतात. काही क्षण शांतता. मग --) लहानपणी मी एक भित्रा मुलगा होतो. आमच्या भागात राहणारा एक साऊथ इंडियन मुलगा मला जाता येता प्रत्येक वेळी एक गुद्दा मारायचा. तो लांबून येताना दिसला तरी मी घाबरायचो. एक दिवशी मात्र मी वेगळंच वागलो. एकदा मी शाळेतून घरी जात असताना मला तो समोरून येताना दिसला. मी माझं दप्तर आधीच काढून जमिनीवर ठेवलं. तो जवळ आला, पण त्यानं मला गुद्दा मारायच्या आधीच मीच त्याला जीव खाऊन मारायला सुरुवात केली. माझ्या मधल्या बोटाच्या मागचं खालचं हाड त्याच्या पाठीत जोरात लागलं. अनेकदा लागलं. तो कळवळला. आणि नंतर सावकाश निघून गेला. पुन्हा त्यानंतर कधी तो माझ्या नादी लागला नाही. हाच प्रयोग मी आणखी दोनतीन ठिकाणी केला. आणि मला कळलं की भित्रं राहण्यापेक्षा असं धाडसी

राहणं बरं आहे. तेव्हापासून धाडसी राहणं ही माझी जगण्याची पध्दतच झाली ... पण आता मात्र धाडसी राहावं की भिऊन राहावं हा प्रश्न पुन्हा समोर आलाय ... तरीपण ... ठीकाय .. मला प्रथम तुमचे आभार तर मानलेच पाहिजेत ...कारण कामगार ज्याच्याशी बोलतील असे आपल्यातले फक्त तुम्हीच आहात...

शिंदे : तुम्ही जरा आपुलकीनं -- सहानुभूतीनं वागावं अशी त्यांची अपेक्षा आहे --

मोहिले : आणि धाडसानं वागणं ही जगण्याची पध्दत बनवून बसलोय मी -- जसं भिऊन वागणं हे मराठ्यांनी जगायचं साधन बनवलंय -- तुमचं म्हणायचं तर तुटक वागणं -- तुम्हाला कुणीही फार जवळ करणार नाही --

शिंदे : ( किंचित् स्मित करून -- ) बरोबर आहे.

मोहिले : त्यांनी हे वापरायचा विचार बोलून दाखवणंही अमानुषपणाचं आहे --

शिंदे : पण ते तसं करणार नाहीयत -- फक्त याची तुम्हाला जाणीव ठेवावी लागणार आहे -- म्हणजेच तुम्ही त्यांच्यावर हल्ले करू शकणार नाही --

मोहिले : ...हं...बघू ...तशी तर अनेक कारणं आहेत त्या आत्महत्येला.

शिंदे : पण तुमच्या मुलीचंही एक आहे ना त्यात ? तिनं अचानक दुरावा का तयार केला ? त्याच्या मनात तिच्याबद्दल काय भावना आहेत हे तिला जाणवलंच नसेल का ? तिचंही नकळत प्रोत्साहनच नव्हतं का ? आणि यात अचानक तुटकपणा आणणं हे कारण नाही होऊ शकत ?

मोहिले : खरी कारणं तर मग ही आहेत -- लहानपणी मी भित्रा असणं -- मराठ्यांनी कायम भिऊन वागणं – इथली युनियन मस्तवाल असणं -- तसं नसतं तर माझा इथं येण्याचा प्रश्नच नव्हता -- या पध्दतीनं तर मग जगात घडणाऱ्या सगळ्याच गोष्टींना सगळेच जबाबदार आहेत --पण घेतं कुणी अशी जबाबदारी ? आणि या अर्थानं तो मुलगा स्वत:ही जबाबदार आहेच की स्वत:च्या आत्महत्येला ! परिणाम करणं आणि परिणाम करून घेणं यातून कोण मोकळं असतं ? कुणीही नाही ! त्यामुळं जगातल्या कुठल्याही घटनेचे धागेदोरे आपल्यापर्यंत येणारच --

शिंदे : मी माझं काम केलं --

मोहिले : आभारी आहे -- पण आपल्यांत ही जी बोलणी झाली त्याची तुम्ही कुठंही वाच्यता करणार नाही असा विश्वास बाळगतो -- आपले संबंध तसे फारसे चांगले नसले तरी --

शिंदे : तो माझा स्वत:चा नैतिक प्रश्न राहील -- पण या प्रकारात, थोडक्यात म्हणजे, युध्द पूर्ण होण्यापूर्वीच तुमचा पराभव झाला आहे, असं मला वाटतं. यातूनही मार्ग काढून आपलं वर्चस्व निर्माण करता येईल का या दिशेनं तुम्ही विचार करू नये असं मी एक सहकारी म्हणून सुचवतो. पण ते तुम्ही ठरवालच -- अच्छा -- निघतो।

मोहिले : हं -- ( शिंदे जातात. मोहिले काही क्षण विमनस्क ... मग स्वगत ...)म्हणजे आता प्रियाबद्दलचं प्रेम आणि जिंकायची इच्छा यातनं एकाची निवड करावी लागणार आहे -- म्हणजे हे सोडूनच जावं लागणार -- पण सोडण्याचं कारण वेगळं लागेल -- वरिष्ठांशी आधी ठरवून -- मग -- वरिष्ठांशी मतभेद हे कारण ठीक होईल -- मतभेदाचं कारणही युनियनशी संबंधित चालणार नाही -- दुसरं काही काढावं लागेल – सगळ्यांना पटणारं -- म्हणजे ही कंपनी सोडून जाण्याला पराजयाची पार्श्वभूमी टाळता येईल ...एक प्रकारे ही इथली युनियन त्या मुलाच्या आत्महत्येचं कारण बनली -- पण आता ती आत्महत्या मात्र या युनियनचं रक्षण करणार आहे -- मला इथून घालवून --( उघड --) धोंडी ऽ ऽ —

( मालती येते. )

मालती : धोंडी नाहीय --

मोहिले : प्रियाला पाठव -- ( क्षणभर पाहून मालती आत जाते. जरा वेळाने प्रिया येते. तिची अंघोळ वगैरे झालेली असून ती फ्रेश दिसते आहे. )

प्रिया : काय पप्पा ?

मोहिले : हं -- बस -- तुझ्याशी जरा बोलायचं होतं --

प्रिया : ( बसत -- ) काय ?

मोहिले : मागे मी एकदा तुला त्या रामचंद्र चव्हाणबद्दल बोललो होतो --

प्रिया : हं हं -- आमच्या कॉलेजातला --

मोहिले : त्याच्याशी तुझी मैत्री होती ?

प्रिया : ( क्षणभरानं --) मैत्री कसली पप्पा -- ओळख -- आणि चांगला आहे मुलगा तो --

मोहिले : म्हणजे विशेष काही मैत्री नव्हती !?

प्रिया : तसं जर काही असतं तर तुम्ही सांगितल्यावर इतक्या सहज तोडून टाकू शकले असते का मी त्याला ?

मोहिले : त्या मुलानं आत्महत्या केलीय असं मला कळलंय -- ( तिच्याकडे आता निरखून पाहात राहतात. )

प्रिया : ( किंचित् धक्का बसतो पण सावरत --) काय ! रामचंद्र चव्हाणनं ? आत्महत्या ?

मोहिले : आता ते फार मनावर घ्यायचं काही कारण नाही -- संबंधही नाही -- पण तुला काही माहिती आहे का याबद्दल -- म्हटलं विचारावं सहज --

प्रिया : तुम्हाला कसं कळलं पप्पा ? -- तो असं करेल हे म्हणजे -- आश्चर्य आहे !

मोहिले : नाही -- नाहीतर व्हायचं काय, तुझी न त्याची असायची मैत्री आणि प्रेमभंग वगैरे असं काहीतरी निघालं म्हणजे पंचाईत व्हायची --

प्रिया : प्रेमभंग ? काहीतरीच काय पप्पा ! --

मोहिले : नाही ना तसं काही, मग झालं तर -- मला वाटलंच होतं -- पण म्हटलं उगीच कुणीतरी काहीतरी अर्थ

लावायचा आणि काहीतरी बोलायचं असं नको व्हायला -- निदान आपल्याला खरं काही असलं तर माहीत असावं --

प्रिया : चव्हाणनं आत्महत्या केली? ! कमाल आहे ! कधी पप्पा ? तुम्हाला कसं कळलं ?

मोहिले : काल रात्री -- मला आज सकाळी कळलं -- ते जाऊ दे -- तू मात्र आता एक लक्षात ठेव -- म्हणजे तू हे लक्षात घेणं आवश्यक आहे -- तुझ्या कॉलेजातला आणि तुझ्या चांगल्या ओळखीचा मुलगा होता तो -- त्यामुळं थोडा धक्का बसणारच तुला -- पण काय आहे की आत्महत्येचा मामला आहे -- उगीच नाहक त्रास नको -- तुला फार काही वाटलंय असं उगीच अनावश्यक प्रदर्शन कुठं करू नकोस --

प्रिया : नाही -- झालं ते वाईटच आहे पप्पा -- पण मला फार काही कशाला वाटतंय ? इतरांसारखंच मलाही वाईट वाटणारच.

मोहिले : ते ठीक आहे. बरं चला, मला निघालं पाहिजे -- जेवायला आता मी येईन परत तासा दोन तासांनी -- उशीर झाला आज --( उठतात --) तर तेवढी काळजी घे म्हणजे झालं -- अं -- ( आत जातात. प्रिया भावहीन चेहऱ्याने बसून. मोहिले पुन्हा बाहेर येतात --) धोंडी -- ए धोंडी ऽ

धोंडी : ( बाहेरून -- ) जी -- ( येतो. )

मोहिले : हं -- चला -- ( बूटबीट घालतात. धोंडी आतून ब्रीफकेस आणतो... दरम्यान प्रिया, जवळचं वर्तमानपत्र घेऊन पाहात बसलेली --) हं -- चला -- बरं प्रिया -- अं --

प्रिया : ठीक आहे पप्पा -- ( मोहिले जातात. मागून धोंडी जातो. प्रिया अजूनही काही वेळ मख्खपणे वर्तमानपत्र पाहात बसलेली. काही क्षणांनी कारचा आवाज लांब जातो. शांतता. हळूहळू प्रियाचा चेहरा बदलत जातो. वेडावाकडा होत जातो... ताबा सुटत जातो आणि ती हळूहळू दुंदके देऊ लागते. नंतर सोफ्यावर मान टाकून गदगदत राहते. धोंडी येतो. काही क्षण पाहात उभा राहतो . त्याला काहीच कळत नाही. पण त्याला काही बोलायचा धीरही होत नाही. आतून मालती येते. थबकते. गदगदत पडलेल्या प्रियाकडे पाहते. धोंडी निघून जातो. मालती नुसती उभी. काही बोलावं की बोलू नये, काही सुचत नाही. पण शेवटी धीर करतेच --)

मालती : प्रिया -- ए प्रिया --

प्रिया : ( तिचा आणखीनच बांध फुटतो ...) मम्मी...!... तो फार चांगला होता मम्मी ... गरीब होता अगदी.. कुणालाही कधी दुखवायचा नाही ... नमून वागायचा ...

मालती : कोण ? कोण म्हणतेयस तू -- थांब हं -- आलेच --( चर्चा टाळण्यासाठी झटकन आत जाते..)

प्रिया : ( मोहिल्यांच्या, पिट्टूबाबतच्या स्वगतांच्या वेळी असणारे तेच पार्श्वसंगीत सुरू ...) तसं काहीच नव्हतं -- पण तो फार चांगला होता -- गरीब होता -- त्याचा आवाज -- त्याचं शहाणं बोलणं... तो चांगला होता.. किती गरीब होता... ( रडत राहते... ) आता नाहीय तो .. नाहीय आता.. काहीतरीच करून

बसलाय तो .. त्याच्या चेहऱ्यावर एक अथांग उदासीनता असायची ... सगळं जग त्यात बुडून जाऊ शकेल अशी ... खोल उदासीनता ... असं वाटायचं की ही उदासीनताच फक्त आधार होऊ शकते जगण्याचा ... कुणाच्याही ... तो नाहीय ... पण त्याची ती उदासीनता ... अमर राहील ती...शक्ती देत राहीत ती मला... शक्ती देत राहील... ( काही क्षणांनी हमसू लागते, गदगदत राहते...मालती येते... तिच्याकडे नुसती पाहात उभी राहते... इथे अंधार होत जातो... पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा -- पहिल्या अंकाच्या शेवटच्या  दृश्याप्रमाणे मोहिले सरदाराच्या पोषाखात उजव्या बाजूला उभे -- समोर अधांतरी पाहात. तेच लढाईचे संगीत पण आता सौम्य झालेले. डाव्या हाताला मागे शिंदे उभे. डावीकडे, पुढे मराठे, उजवीकडे,पुढे मालती  आणि तिथेच कडेला धोंडी. सगळे मोहिल्यांकडे पाहताहेत.)

शिंदे : ( तिथूनच'--) पावसकरांनी सरळ सांगितलंच आहे ... घडलेली आत्महत्येची घटना घडलीच नाही असं तुम्ही करू शकत नाही. त्या घटनेचं पोलीस रेकॉर्ड, त्याच्या वह्या, डायऱ्या हेही तुम्ही नष्ट करू शकत नाही. सध्या युनियनवाल्यांचाही असा एखादा वापरता येईल असा वीकपॉईंट तुमच्याकडे नाही की ज्याच्या बदल्यात तडजोड व्हावी. आणि कालहरण करून त्यांच्या हातातला हा पत्ता जुना -- निरुपयोगी करायची खेळी ते तुम्हाला खेळू देणार नाहीत. त्यांनी तुम्हाला पंधरा दिवसांची मुदत दिली आहे.

मराठे : साहेब नमतं घेत तुम्ही इथं राहू शकणार नाही ... माघार घेणं हे तुमचा स्वभावात नाही... त्यामुळं, पराजयाची पार्श्वभूमी तयार न होता इथून बाहेर पडणं हाच मार्ग घेणं भाग आहे....

शिंदे : तुम्ही इथून गेल्याचा विजय ते साजरा करणार नाहीत असं त्यांनी आश्वासन दिलं आहे. अर्थात ते ते पाळतील वा न पाळतील --

मालती : ( काही क्षणांनी -- ) ... ती आत्महत्या किंवा आपल्याला हे इथून सोडून जावं लागणं -- या दिसणाऱ्या घटना आहेत -- पण या नकोत घडायला असं म्हणून उपयोग काय ? या घटनांचे धागेदोरे तर आपल्या सगळ्यांच्या रोजच्या जगण्या-वागण्यात दूरवर पसरलेले आहेत...मन कधी भीत नाही, एकाकी होत नाही, विजयी किंवा पराभूत होत नाही, किंवा कधीच दुखावलं जात नाही -- असं जगता येईल ?....

मोहिले : ... माहीत नाही... ( बसत, मुगुट उतरवून ठेवत ...) माहीत नाही ... ( जणू गढलेले...) नाही माहीत... ( मराठे थोडे जवळ येऊन उभे -- लाचार. धोंडी डोळे पुसतो. क्षणभरानं मोहिले जणू भानावर येत पुन्हा हळूहळू उभे राहतात...आपलं व्यक्तिमत्व एकवटत ...)...नाही...असं नाही...या दोन्ही घटनांना कारणीभूत झालीय प्रिया -- असंच म्हणावं लागेल ... पण तिला ते माहीत नाही... तिला ते माहीत होताही कामा नये... तिची काळजी घ्यावी लागेल... ( इथे हे दृश्य स्थिर होते...क्षणभरानं हळूहळू पडदा पडत जातो ...)

**-- अंक दुसरा समाप्त --**

सूचना : सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.

चं. प्र. देशपांडे

फोन -- ९३७१००५७७३.

ईमेल – champrade@gmail.com

संकेतस्थळ – www.champralekhan.com